शिवचरित्रसाहित्य–खंड १० वा

–कोंकणच्या इतिहासाचीं साधनें–

BHĀRATA ITIHĀSA SAMSHODHAKA MAṆḌALA

POONA

Vol. XXXIV } Quarterly { No. 3-4

(135-136)

1954 January-April

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, पुणें

वर्ष ३४] त्रैमासिक [अंक ३-४

(१३५-१३६)

१८७५ पौष-१८७६ चैत्र

Printed by Mr. Keshav Ganesh Sharangpani at the Aryabhushan Press, House No. 915/1 Shivajinagar, Poona 4, and published by Prof. R. V. Oturkar Hon. Secretary, B. I. S. Mandala, at 313A Sadashiv Peth, Poona 2, India.

संपादकीय निवेदन

शिवचरित्र साहित्य खं. ९ वा श. १८६६ त त्रैमासिक व. २४ अं. ४ म्हणून प्रसिद्ध झाला. त्यास आज ९ वर्षे होऊन गेल्यावर शिवचरित्र साहित्याचा खं. १० वा मंडळ त्रैमासिक व. ३४अं. ३–४ म्हणून प्रसिद्ध होत आहे शिवचरित्राचीं साधनें वेगळीं काढून प्रसिद्ध करण्याची मूळ प्रेरणा कै. दत्तोपंत आपटे यांची; त्यांच्या दहाव्या स्मृति-दिनीं (धनत्रयोदशी) हा १० वा खंड प्रसिद्ध व्हावा असा योग श्री. आवळसकर यांनीं साधला. श्री. आवळसकर हे मंडळाचे अभ्यासू संशोधक. त्यांनीं मंडळांतील कोकणच्या इतिहास संशोधनाची बाजू मोठ्या साक्षेपीपणानें उचलून धरिली आहे. शि. च. सा.खं. ९ मध्यें त्यांनीं चौल–अधिकारी–दप्तराचा परिचय करून दिला. पुढें तीन वर्षांनीं १८६९ सालीं 'आंग्रेकालीन अष्टागर' या ग्रंथाच्या द्वारें पेशवेकालीन अधिकारी शकावलीचा वाचकांस लाभ करून दिला. व लगोलग पुढल्याच वर्षी 'आंग्रेकालीन पत्रव्यवहार' मंडळ त्रैमासिकाचे अं. ३–४ म्हणून उजेडांत आणला. या सर्व मराठी साधनांच्या वाचनानें तळ कोंकणांतील पोर्तुगीजादि परकीयांचीं कारस्थानें अभ्यासकांस अधिक स्पष्टपणें कळत आहेत. श्री. आवळसकर यांनीं हीं साधनें एकामागून एक प्रसिद्ध करित असतां अनेकांशीं गोड शब्द बोलून अंशमात्र द्रव्यसाह्य मिळविलें. दिवसेंदिवस तेंहि आटूं लागलें. पण श्री. आवळसकर कसचे निराश होतात ! त्यांनीं आपणांस मिळालेलें द्रव्यसाह्य पैतृक ऋण मानून या शिवचरित्र साहित्य खं. १० च्या प्रकाशनासाठीं आपलें अंशसाह्य दिलें. मंडळास अशा अभ्यासू, सौजन्यशील, त्यागी तरुणाचा आग्रह कसा मोडवेल ? मंडळानें त्यांच्या विनंतीस सहर्ष रुकार दिला. अशी साधनसामग्री सरकार–दरबार–मार्फत प्रसिद्ध होती तर नुसता संपादकीय खर्च शेंकडों रुपयांचा झाला असतां. श्री. आवळसकर या इतिहास-शिक्षकांनीं पोट बांधून संपादन केलें व स्वतः अंशमात्र पदरमोड करून प्रसिद्धीचें श्रेय मंडळाचे पदरीं बांधलें.

अशा परंपरेवर आजचें महाराष्ट्रांतील इतिहास संशोधन हिंमत बांधून आहे. श्री. आवळसकर यांनीं कोकणच्या इतिहासाच्या अभ्यासाची मंडळांतील एक बाजू धिम्मेपणानें उचलून धरली आहे. पुणें विद्यापीठाच्या साह्यानें चाललेल्या मराठी इतिहास शकावलीच्या प्रदीर्घ उद्योगांतहि त्यांचें साह्य होत आहे. विश्वास वाटतो कीं ही धुरा ते अशीच वाहात राहतील व एकदोन अभ्यासी तरुण आपल्या तालमींत तयार करतील.

× × ×

केव्हां केव्हां संशोधनाचें काम चालूं असतां कार्यांस अनपेक्षित भरती येते. श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारकाच्या विश्वस्तांकडून मंडळास ग्रंथप्रकाशनासाठीं

२६८
व. भा

भारत-इतिहास-संशोधक-मंडळ, स्वीय ग्रंथमाला क्र. ८६

शिवचरित्र-साहित्य

खंड १० वा

- कोंकणच्या इतिहासाचीं साधनें -

संपादक

श्री. शां. वि. आवळसकर,

(शि. च. सा. खंड ९, आंगरेकालीन अष्टागर,
आंगरेकालीन पत्रव्यवहार-या संशोधनात्मक
पुस्तकांचे संपादक)

शा. १८७५
धनत्रयोदशी

किंमत तीन रुपये

स. १९५३
नवंबर ४

कार्यकारी मंडळ

अध्यक्षः- १ श्रीमंत राजे मालोजीराव नाईक निंबाळकर राजेसाहेब सं. फलटण

उपाध्यक्षः- १ श्रीमंत राजे रघुनाथराव बाबासाहेब, पंडित पंतसचीव, के. सी एस. आय्. राजेसाहेब सं. भोर

२ श्री. सर. गोविंद बळवंत शास्त्री पटवर्धन, पुणें २

३ श्री. रा. चंद्रशेखर गोविंद आगाशे, पुणें २

शक १८७५ ते १८७७

कार्याध्यक्षः- १ म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार, पुणें २

खजिनदारः- १ श्री. गोविंद विष्णु रानडे, कॉंट्रॅक्टर पुणें ४

चिटणीसः- १ प्रा. राजाराम विनायक ओतुरकर, पुणें ४

२ श्री. शंकर नारायण जोशी, पुणें २

३ श्री. गणेश हरी खरे, पुणें २

सभासदः- १ श्री. स. गंगाधरराव नारायणराव मुजुमदार, पुणें २

२ प्रि. जगन्नाथ रघुनाथ घारपुरे, पुणें ४

३ श्री. विठ्ठल दत्तात्रय घाटे, पुणें ४

४ श्री. जनार्दन सखाराम करंदीकर, पुणें २

५ प्रा. रामकृष्ण पुरुषोत्तम पटवर्धन, पुणें ४

६ प्रा. नरहर रघुनाथ फाटक, मुंबई ४

७ श्री. चिंतामण गणेश कर्वे, पुणें २

८ श्री. विष्णु सिताराम चितळे, पुणें ५

९ श्री. पांडुरंग रंगनाथ गोखले पुणें २

१० श्री, नीळकंठ विठ्ठल सोवनी पुणें २

प्रस्तावना

(१) शिवचरित्रसाहित्याचा ९ वा खंड प्रसिद्ध होऊन अनेक वर्षे लोटली; त्यांत कोंकणच्या शिवपूर्व आणि शिवकालांतील पत्रें देऊन उत्तर कोंकणच्या राजनैतिक व सामाजिक इतिहासाचा मीं उपन्यास केला आहे. या दहाव्या खंडांत पुनश्च उत्तर कोंकणबद्दलचीं कांहीं पत्रें देण्यांत येत आहेत; शिवाय रायगड व प्रतापगडकडील कागद इतिहासाचे आस्थेवाइकांपुढें ठेवीत आहें.

(२) प्रस्तुत खंडांत चौलच्या अधिकारी घराण्यांतील कांहीं कागद प्रसिद्ध होत आहेत. अधिकारी घराण्याची माहिती खंड ९ च्या प्रस्तावनेंत दिली आहे. कांहीं कागद पोलादपूर येथील श्री. रावजी गोविंद चित्रे यांचे दप्तरांतील आहेत. चित्रे घराणें सध्यां देवळें, विन्हेरें, पोलादपूर, देवास इत्यादि ठिकाणीं नांदत असून कारणपरत्वें या घराण्यांतील पुरुषांचीं आडनांवेंहि बदललीं आहेत. देवासचे चित्रे आपणांस देवळेकर म्हणवितात. देशपांडेपणाचें वतन चालवीत असल्यामुळें कांहीं चित्रे मंडळी 'देशपांडे' झाली आहेत. कांहींजण आपणांस कोंढवीकर म्हणवितात. चित्रे घराणें म्हणजे बाळाजी आवजी चिटणिसांचें घराणें होय. या घराण्याची इतिहासकालीन सेवा व लौकिक प्रसिद्ध आहेच. या घराण्यांतील कागद हातीं लागावेत म्हणून मी सातआठ वर्षें प्रयत्न करीत होतों व त्यांत मला यश आलें. त्यांतील कांहीं कागदपत्र येथें प्रसिद्ध होत आहेत, याचा मला आनंद व समाधान होत आहे. कोंकणचें हवामान दमट, पाऊस जास्त, यांमुळें कोंकणच्या प्रदेशांत कागदपत्र टिकत नाहींत. थोडें जरी दुर्लक्ष्य झालें, तरी वाळवीनें कागदांची माती होते. अशा स्थितींतहि रावजीपंतांनीं कागद साक्षेपानें जपून ठेवले व मला विश्वासपूर्वक दाखवून नकलूं दिले; ते येथें-शिवकालापुरते देत आहें. प्रस्तुत पुस्तकांतील शेवटचा लेख 'शिवकालीन टिपणें' म्हणून छापला आहे. तो जिज्ञासूंनीं अवश्य पहावा. शिवकालांत झालेल्या अनेक घडामोडी चित्रेमंडळी अनुभवीत होती व लिहून ठेवीत होती. त्यांतील कांहीं घटना सदर टिपणांत पहावयास मिळतील व ती माहिती म्हणजे आपल्या जुन्या ज्ञानांत नवी भर होय. त्यांत थोडा उणेपणा आला आहे तो इतकाच कीं कालोल्लेखाचे दृष्टीनें या टिपणांतील काल प्रत्यंतरपुराव्यानें पूर्ण विश्वसनीय ठरत नाहीं, पण मजकुराचे दृष्टीनें या टिपणांत दोष नाहीं एवढेंच नव्हे, तर ऐतिहासिक सत्यच त्यांत देण्याचा लेखकाचा हेतु आहे, अशा खात्रीनेंच तीं टिपणें येथें देण्यांत येत आहेत. रावजीपंतांनीं याबाबत मला जी मनःपूर्वक मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहें.

(३) प्रस्तुत खंडांत प्रतापगडावरील शिवकालीन कागद प्रसिद्ध होत आहेत. प्रतापगडच्या भवानीची स्थापना अफझलखानाच्या मृत्यूनंतर झाल्यावर तेथें हडप घराणें भवानीची पूजा करण्याकरितां नेमण्यांत आलें. तें घराणें विद्यमान असून प्रतापगडावरच नांदत आहे. सध्यांचे देवीचे पूजक— गणकभूषण भाऊशास्त्री उपाध्ये यांनीं आपले संग्रहांतील कागद मला दाखविले व नकलण्यास परवानगी दिली. त्यांतील कांहीं कागदांचा उपयोग मीं म. म. पोतदार गौरवग्रंथांतील लेखांत केला आहे व कांहीं येथें देत आहे. या संग्रहांतील पेशवेकालीन ६०।७० कागद आतां मजजवळ अप्रसिद्ध स्वरूपांत शिल्लक आहेत. श्री भाऊशास्त्री यांचा मी फार फार आभारी आहें.

(४) याशिवाय, वाळण बुद्रुक येथील श्री. तुकाराम झुरु कालगुडे, वरंध येथील श्री. शंकर रामचंद्र देशमुख, शिर्केकरी, गायकवाड यांजकडील कांहीं कागद प्रस्तुत संग्रहांत प्रसिद्ध होत आहेत. उत्तरकोंकणांत मीं जे हजारों कागद ठायीं ठायीं हिंडून नकलले, त्यांतील शिवकालीन कागदांचा भाग या पुस्तकाचे द्वारें मांडून तेवढ्यापुरता मोकळा झालों आहें. पेशवेकालीन कागदांचा ३।४ पुस्तकांचा संग्रह शिल्लक आहे, तोहि मंडळामार्फत वाचकांपुढें ठेवण्याची उमेद मी बाळगून आहें.

(५) या पुस्तकांतील पत्रांचें स्वरूप आतां ध्यानीं घ्यावयाचें. रायगडाभोंवतीं औरंगजेब पातशहाचा मातबर सरदार झुल्फिकारखान याचा वेढा पडला व कांहीं दिवस नेटानें चालला. अवघड जागा; देशप्रेमी, लढाऊ-मराठ्यांचा आसमंत, अशा स्थितींत फितुरीनें किल्ला घेतां आला तरच शक्य, हें जाणून मोगलांनीं भेदाचा अवलंब केला. एकटा सूर्याजी पिसाळ अनुकूल होऊन भागणार नव्हतें. अनेक 'पिसाळ' या प्रसंगीं फितूर झाले असतील! **ले. २४ मध्यें** दुसऱ्या फितुरी माणसाची माहिती आली आहे. वरंधचे देशमुख नरसोजी गायकवाड रायगडवर चाकरीनिमित्त होते; त्यांनीं इतकातखानास गडावरची हावपालत सांगितली व वैय्यक्तिक लोभाचे भरीं पडून फितुरी केली. 'हा गुन्हा माफ करावयाचा नव्हे,' असें मराठा मंडळाचें स्पष्ट मत असल्यामुळें देशमुखांची देशमुखी जप्त झाली. नरसोजीचा मुलगा संभाजी यानें निष्ठापूर्वक अनेक वर्षे मराठी राज्याची सेवाचाकरी केली व देशमुखीचे जुन्या वतनाची मागणी केली. त्याचे चाकरीवर नजर देऊन पांचशें होन खंड घेऊन देशमुखी छत्रपति राजारामानें त्यास परत केली.

(६) रायगडनंतर औरंगजेबानें प्रतापगड सर केला. त्यावेळीं भवानीची मूर्ति 'दुष्ट संसर्गा' पासून सुरक्षित ठेवण्यांत आली. हा किल्ला मोगलांच्या ताब्यांत फार दिवस राहिला नाहीं. १६९१ त गडावर पुन्हा भवानीची स्थापना करण्यांत आली. विश्वनाथभट पूजक पुन्हां गडावर रुजू झाले व पूजेअर्चेचें पूर्वीचें काम पुन्हां होऊं लागलें; त्यांस देवीच्या पंचामृत पूजानैवेद्याची अनुकूलता करून देण्यांत आली. देवी-

कडील खर्चाची व्यवस्था नीट व्हावी म्हणून मौजे कावडी हा गांव इनाम देण्यांत आला. गडावर हवालदार, सबनीस इ. वतनदार मंडळी पुन्हां नेमण्यांत आली. १६९८ मध्यें रामचंद्रपंत अमात्य भवानीकडील सबनीस होता. त्यानें 'बाळाजी विश्वनाथ' यास सबनिशीची मुतालिकी दिली आहे. हा बाळाजी विश्वनाथ म्हणजे भावि पेशवा नसावा असें वाटतें. **लेख १७, १८ २५, २६ मध्यें** प्रतापगडच्या भवानी संबंधीचा मजकूर आला आहे. त्यासंबंधांत शेवटचा लेख व म. म. पोतदार गौरवग्रंथांतील प्रतापगडचे भवानीसंबंधीचा लेख पहावा; म्हणजे या मुद्याची स्पष्ट कल्पना होईल.

(७) लेख १५ म्हणजे सन १६८६ मधला एक न्यायानिवाडा आहे. प्रल्हाद निराजीनें त्यांत शिवछत्रपतींचें एक धोरण सांगितलें आहे. तो म्हणतो, "राजश्री छत्रपतींचा तह कीं वतनदाराचें वतन विकत घेण्याची वासना कोणी धरूं नये व वतनदारानेंहि तें विकूं नये. विकत घेणारास शिक्षा व्हावी व विकणारासहि सख्त ताकीद व्हावी." वतनासंबंधीचा हा विचार हृद्य आहे. छत्रपतींनीं वतनें सवंग होऊं दिलीं नाहींत व अपवाद म्हणूनच तीं दिलीं. वतनाची वारंवार खरेदी-विक्री होऊं लागली, तर ती एक बाजारी वस्तु होते व वतन देणारावेणारांची किंमत कमी होते. वतन ही एक पवित्र वस्तु आहे व वतनदार हा राष्ट्रांतला मोठाच कर्तबगार व निष्ठावंत माणूस असला पाहिजे, अशी वतनदाराबद्दलची छत्रपतींची भावना या पत्रांत दृग्गोचर होते.

(८) लेख ५ मध्यें दोन वंशावळी आहेत. एक रायाजी सत्तक प्रभु याची व दुसरी रघुनाथ प्रभु याची. या दोन्ही वंशावळा इतिहासाचे अभ्यासूंस महत्त्वाच्या वाटतील. रायाजी प्रभु हा संभाजी व राजाराम यांच्या कालांतला चौल कडील कर्तबगार सुभेदार आहे. त्याचे अनेक कागद शि. च. सा. खंड ९ मध्यें आले आहेत. रघुनाथ प्रभु हा कान्होजी आंगऱ्यांचा कर्तबगार दिवाण. याची वंशावळ प्रसिद्ध झाल्यामुळें आतां १६८० ते १७३० या ५० वर्षांतील कागदपत्र शोधण्याचा एक मार्ग या घराण्यांचे द्वारें सांपडत आहे. रघुनाथप्रभु गुप्ते घराण्यांतला; सध्यां हें घराणें वऱ्हाडांत अकोला येथें असून तेथें कागद आहेत असें कळतें.

(९) प्रस्तुत पुस्तकांत शिवछत्रपतींच्या रायगडवरील रत्नशाळेचे उल्लेख आले आहेत त्या दृष्टीनें लेख ४१ व ले. १६ पहावेत. रघुनाथ नारायण हणमंते याचा मुलगा नारोपंत अमात्य असतां १६८९ मध्यें त्याची चीजवस्त पेढांचे येथें लुटण्याची हकीकत ले. १६ मध्यें आली असून सर्व चीजवस्त परत मिळविल्यावर त्याचें सोन्याचें कलमदान रत्नशाळेकडे जमा झालें आहे, पण त्यास सोन्याची भरपाई करण्यांत आली आहे. धांदलीच्या व गडबडीच्या त्या काळांतहि ज्याची वस्तु त्यास परत करण्याची धडपड केवढी ! खंड ९ मध्येंहि असे उल्लेख आले आहेत.

(१०) ले. १, ३, ६ व २२ मध्यें कोंकणच्या तीनशें वर्षापूर्वीच्या व्यापाराचें स्वरूप प्रतिबिंबित झालें आहे. पहिला कागद दौलताबाद येथील खरेदीवरील जकात माफ केल्याचा आहे. ले. ६ हा शिवपूर्वकालीन जकातीच्या नाक्यावरील जकातीच्या दरांचा व वस्तूंचा जणुं तक्ताच आहे. या कागदावरून त्या कालीं निजामशाहींत प्रचलित असलेल्या लहानमोठ्या नाण्यांची यादीहि आपणांस एकत्र पहावयास मिळते. बंदी व गुलाम यांवर जकात आहे; म्हैस, घोडे, बैल यांवर जकात देणें आहे. कोंकणांतील व्यापाराच्या वस्तु किती आहेत पहा ! त्यांत कापडाचे अनेक प्रकार आहेत–सुती-रेशमी कापड, खारवा, पीतांबर, छिटाचीं कापडें, सखलाद, पोर्तुगीज कापड, मखमली टोप्या, घोंगड्या, गोधड्या, धोत्रें, लुगडी, रंगीत कापड, नवार यांवर जकात आहे. गोणपाट; गहूं, मूग, वाटाणे, हरभरे, तूर, तीळ, उडीद, मसूर यांवर दरगोणीस जकात आहे. जायफळ, मायफळ, जायपत्री, लवंग, हिंगूळ, शिलारस, शेंदूर, हिंग, अकु, गूळ, काकवी; चिंच, कापूर, पारा, मिरी, मेथी, केशर, कल्हें, किती म्हणून जकातीच्या वस्तु सांगाव्यात ! धावटीची साल, चंद्रस, सोरा, काथ्या, लोखंड या गलबतें बांधण्यास लागणाऱ्या वस्तूंवर जकात आहे. अनेक प्रकारचें चंदन येथें येत आहे. फळांवर जकात आहे. साबण आहेच. मिठावर जकात आहे. वऱ्हाडाच्या जाण्यायेण्यावर जकात आहे. वकरीं व पादत्राणेंहि जकातींतून सुटलेलीं नाहींत. कोळ्याचें जीवनसाधन जीं जाळीं त्यांवर जकात आहे ! शेतकऱ्याचा तंबाखु जकातींतून सुटलेला नाहीं, ही झाली खाडींतील व्यापारावरील जकात.

ले. ३ मध्यें जमिनीवरील व्यापाराच्या जकातीचा उल्लेख येतो. येथें महसूल नांवाचा एक कर आहे. दुकानदारांनीं सरसुभ्यास द्यावयाच्या 'खापणी'चा उल्लेख आहे. कांहीं जकाती सवापट आहेत. सिनळकीवर कर आहे. बाहेरून येऊन स्थायिक होऊं पहाणारांवर कर आहेत. नवीं गलबतें बांधून व्यापार करूं इच्छिणारांस सवलत म्हणून निम्मे जकात आहे. व्यापाराची भरभराट पहाण्याचें काम नगरशेट, महाजन व चौधुले या वतनदारांकडे असून त्यांस मानपान आहेत. सारांश, उपरिनिर्दिष्ट चार लेख सामाजिक व आर्थिकदृष्ट्या फार महत्त्वाचे आहेत.

(११) निरनिराळ्या स्वरूपाच्या वतनदारांच्या हक्कांची कल्पना यावी म्हणून पूर्वी शि. च. सा. खंड ९ मध्यें कांहीं लेख छापले आहेत; त्यांवरून शिवपूर्वकालीन कोंकणांतील वतनदारीचें स्वरूप कळून येईल. येथें लेख ४, ४० व ८ पहा. ले. ४ मध्यें वतनदार परटांचे हक्क आले आहेत. लग्नांत पायघड्या घालण्याचें काम त्याचें. त्याबद्दल त्यास भोजन व चार लारी मिळत. लग्नमंडप कापडण्याचें काम त्याचेंच. शूद्राकडे लग्नप्रसंगीं त्याचें गाणें व्हावयाचें. दिवाळी–दसऱ्यास वतनदारांकडून शिरपाव (म्हणजे पागोटें) त्यास मिळे. शूद्राकडील लग्नास मुंडावळी त्यानें द्यावयाच्या. दिवाळीची ओवाळणी, नारळीपौर्णिमेचा नारळ वगैरे मानपान ले. ४ मध्यें आले आहेत.

ले. ४० मध्यें पंचांगवाचनाची चाल व त्याचा क्रम यांची हकीकत आली आहे. सरकारी अधिकारी केवढाहि 'मोठा' असला, तरी तो 'उपऱ्या.' ग्रामव्यवस्थेंत वतनदारांचा मान मोठा व त्यावरून उत्पन्न होणाऱ्या तंट्यांचें स्वरूप या लेखानें स्पष्ट होतें. ले. ८ मध्यें खोताचा एक मान प्रथमच समजत आहे, तो असा कीं, रायगडकडील जंगलांत शिकाऱ्यांनीं शिकार करण्यास तिकडील खोतांची हरकत नाहीं, पण खोताचा 'लाजीमा' शिकाऱ्यानें दिला पाहिजे. वतनदारांच्या हक्कांचें स्वरूप समजलें, म्हणजे प्रादेशिक रीतिभाति व राहणी यांचा अंदाज लागतो व प्रत्येक वतनदाराची वतन जतन करण्याबद्दल एवढी आटापीट कां, याचाहि उलगडा होतो.

(१२) **लेख २** चें महत्त्व एवढेंच कीं १६४० मध्यें रायगडावर मुसलमान अधिकारी आहेत; त्यावरून स्पष्ट दिसतें कीं १६४० पर्यंत तरी रायरीचा किल्ला (रायगड) चंद्रराव मोऱ्यांच्या ताब्यांत नव्हता. लेख १३ वरून चौलकडील व्यवस्थेंत इंग्रजांचा हातशिरकाव इ. स. १६७९ मध्यें झाला होता. तसेंच, ले. ११ वरून शिवाजीचा राज्याभिषेकापूर्वी चौलकडील भागांत अंमल बसत चालल्याचा देखावा दिसतो. याबाबत शि. च. सा. खंड ९ मध्येंहि कांहीं पत्रव्यवहार प्रसिद्ध झाला आहे.

(१३) **ले. २९** हा चौलच्या अधिकारी घराण्याची पूर्वपरंपरा व कर्तबगारी सांगणारा अस्सल कागद आहे. गुजराथचा सुलतान बहादुरशहा याचा अंमल केवळ गुजराथपुरताच नसून उत्तरकोंकणचा ठाण्यापर्यंतचा मुलुख त्याचे ताब्यांत होता. ठाण्याकडील बऱ्याच गांवांची देशमुखी या अधिकारी घराण्याकडे चालत असतांना, सुलतान बहादुरशहाचे कारकीर्दींत एक युद्ध झालें; त्यांत अधिकारी घराण्यांतील सात भाऊ कामास आले. पातशाहीशीं दाखविलेल्या एकनिष्ठेची ही परिसीमा होय. सदर सात पुरुषांचीं शिरें एका गलबतांत ठेऊन तें गलबत दर्यांत लोटण्यांत आलें, तें चौलजवळ किनाऱ्यास लागलें. यांत कांहीं ईश्वरी संकेत आहे, असें समजून या घराण्यास चौल टप्प्याचे अधिकारीपणाचें वतन देण्यांत आलें. शिवाजीनें चौल भागांत चालविलेल्या 'पुंडाई'चा परिणाम असा झाला कीं, चौल गांवांत एक दिवस आग लागली व अधिकाऱ्यांचीं अधिकारपत्रें आगींत भस्मसात् झालीं. त्यांच्या हक्कांची चौकशी होऊन पूर्वापार संबंध ध्यानीं घेऊन दिलेल्या या शिक्कामोर्तबाच्या कागदांत इ. स. १४०० पासूनची कांहीं हकीकत आली आहे. घराण्याच्या इतिहासाचे दृष्टीनें हा कागद बराच महत्त्वाचा आहे.

(१४) प्रसिद्ध होत असलेल्या कागदांचें, सामान्य स्वरूप येथें संपलें. सदर पुस्तकांत लेख ४१ मध्यें शिवकालीन अधिकारीवर्ग व घटना यांची बरीच माहिती टिपणांचे रूपानें आली आहे, ती रसिक पाहतीलच. या पुस्तकाचे रूपानें शिवकालावर थोडा तपशील पुरविल्याचें श्रेय निश्चित मिळेल, असा विश्वास वाटतो.

(१५) सदर पुस्तकांतील मजकूर एकाच व्यक्तीच्या हातीं लागलेला असला, तरी वाचकांपुढें ठेवण्यापूर्वीं त्याबाबत अनेकांचें भरपूर साह्य मला लाभलें आहे. श्री. शं. ना. जोशी व श्री. ग. ह खरे यांनीं कागदांची रुजुवात घेतली आहे. श्री. खरे व श्री. ब. मो. पुरंदरे यांनीं संदर्भ पहाण्यास भरपूर मदत केली आहे. त्यांच्या दांडग्या वाचनामुळें संदर्भ पहाण्याचें काम मी अल्पावधींत पुरें करून हें पुस्तक तयार करूं शकलों. भारत इतिहास संशोधक मंडळाचा लोभ मजवर शब्दातीत आहे. मंडळाचे चिटणीस श्री. वि. सी. चितळे व प्रा. रा. वि. ओतूरकर यांनीं हें पुस्तक मंडळातर्फे प्रसिद्ध करून मला पुन्हां एकदां मंडळाचें ऋणी केलें आहे. श्री. रावजी गोविंद चित्रे; अन्य चित्रे मंडळी, वरंधचे देशमुख, गणकभूषण भाऊशास्त्री हडप, उपाध्ये; चौलचे अधिकारी, वाळणचे कालगुडे इत्यादि व्यक्तींनीं आपले संग्रह मला उपलब्ध करून दिले, या सर्वांचा सविनय, आभारदर्शक उल्लेख करणें माझें कर्तव्य आहे. पुस्तकाचीं मुद्रितें तपासण्याचें क्लेशदायक काम श्री. शं. ना. जोशी यांनीं केलें आहे. संशोधनात्मक पुस्तकांचीं मुद्रितें जाणत्या संशोधकानें मूळ साधनांवरून तपासण्यांत जें औचित्य असतें, तें श्री. शंकररावांमुळें साधलें. विषयसूचि त्यांनींच आस्थापूर्वक केली. त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

महाड
२७।८।५३

शां. वि. आवळसकर.

विषयसूचि

(आंकडे लेखांकाचे आहेत. पृष्ठ असेल तेथें पृ. लिहिलें आहे.)

महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक संस्था

पदटीपांत वापरलेले संदर्भ ग्रंथ

१ शिवचरित्र साहित्य खंड ९ वा	= शि. च. सा. खं.
२ शिवकालीन पत्रसारसंग्रह	= पत्रसा. सं.
३ मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें (राजवाडे) खंड १५	= रा. खं.
४ सभासद बखर	= सभासद
५ जेधे शकावलि	= जे. श.
६ भारत इति. सं. मंडळ इतिवृत्त शके १८३४	
७ उग्रप्रकृति संभाजी	= उग्रप्र. संभाजी
८ स्थिरबुद्धि राजाराम	
९ शिवचरित्र प्रदीप	= शिव. च. प्र.
१० श्रीसमर्थ सांप्रदायाचीं कागदपत्रें	= श्री. सां.

शिवचरित्र साहित्य

खंड १० वा

कोंकणच्या इतिहासाचीं साधनें

ले. १
चौल–अधिकारी

श. १५२०आश्विन वा। ११ रविवार
इ. १५९८ आक्टोबर १५

तालिक

अज दिवाण रा। खास बजानेब सरसमत व कारकुनानी समत **दौलताबाद** बिदानद सु॥ तिसा तिसैन व तिसा मया सौदागर साहारात आहेती ते खरीद फरोख्त करितील त्यांसी जकाती व हर येक बाबे तसवीस ने दीजे जेथे जातील व येतील जाऊ येऊ दीजे कोण्हे बाबे तसवीस ने दीजे खेरीज बकाली केणे तसवीस ने दीजे तेरीख २४ माहे रबिलौवल

पा। **मीरजा पतकी**
सबा [हिजरी]

ले. २
वाळण कालगुडे

श. १५६१ फाल्गुन शु॥ ३
इ. १६४० फेब्रु. १४

(फार्शी गोल शिक्का)

ई कौलनामा अज दिवाण किले **रायेर** बजानेब कारकुनानी हाल व इस्तकबाल अधिकारियानी तपे **बीरवाडी** व खोत व हुदेदारानी
(गोल शिक्का) (अष्टबुर्जी) हाल व इस्तकबाल मौजे **वालण** बु॥ तो॥ मजकूर
(शिक्का) सु॥ सन आर्बैन आलफ **रामजी विठोजी कालगुडे** मोकदम मौजे मजकूर येउनु मालुम केले आपणास इनाम सेत बनाम किन्हे पाटील दर सवाद मौजे मजकूर ढेप टके ४ सालाबाद आपले वडिली खादले होते त्यावरी सेरीकराचा बार मईत जहाला आपण आफ्तफितुरी करिता दर साल गाऊ सोडिला होता बाजद गावास आलो गावीची संचणीरंचणी समजावीस दिवाण न्याई मई मशगुल आसे साहेबी नजर आनायेत करून सदरहु इनाम आपले

वडिली खादले होते ते आपले दुमाला केले पाहिजे म्हणौनु इलतमाशे बराये इलतिमाश खातिरेसी आणुनू **रामजी विठोजीस** इनाम सेत बनाम किन्हे पाटी दर सवाद मौजे मजकूर ढेप टके ४ च्यार याचे वडिली खादले होते तेणेप्रमाणे दुमाला केले आसे देखील कुड बनांबिरा जो सेताचा दागदागीना असे ते दुमाला कीजे आवलियाद व आफलाद चालवीजे दर हर साल खुर्दखताच उजूर न करिता याचे मिसेलीवरून चालवीजे तालीक लहून घेऊन आसल मिसल फिराऊन दीजे (फारसी मोर्तब)

तेरीख १ माहे जिलकाद

[मूळ अत्यंत जीर्ण, तुटकें; नकल व मूळ यांचे साह्यानें उधृत केलें. कागद तुकाराम झुरू कालगुडे रा। बाळण बुद्रुक, ता। महाड यांजकडील.]

ले. ३
चौल अधिकारी

श्री

श. १५६५ कार्तिक वा। ८
इ. १६४३ ऑक्टो. २४

[शि. च. सा. खं. ९ ले. ४० अपूर्ण आहे. त्याचा पुढीलभाग हातीं आला तो–]

२

गे म्हणऊन तरी सदरहु बाच औलाद अफलाद माफ असे तसवीस न लगे

नवे वखारदार **रेवदंडयाहून** समत **संगवी** व **विरजी** पेंठ मजकुरीं येऊन वखारा घालितील तरी ते हरयेक जिनस रेवदंडाहून आणितील व पेठेहून रेवदंडी व घाटास व कोकणांत व हरयेक जागां हरयेक जिनस नेतील तरी बा। कानूप्रमाणें निमे जकाती कुल माफ करणे बाकी निमे जकाती राहील त्याची सवाई बाद देऊन निमेच्या तीन तक्ष्मा घेऊन ज्या। तसवसि न लगे

गोपाल माहाजन व बाजे चाटे **चेऊलकर** व हरयेक उदमी कापड खरीदी करून विकीतील व पेंठेस राहातील व घाटावरून व बाजे जागांहून कापड आणून विकितील तरी बारा साले जाहालियावरीं महसूल बेरीज मोहीन चालवणे म्हणऊन तरी सालाबादप्रमाणें चालऊन ज्याजती तसवीस न लगे

रेवदंडाहून **लख सेणवी** कटक व **बादुल सेणवी** नागर व **नारायेण सेणवई** व **रघुनाथ सेणवै** पेठेस येऊन वखारा घालतील ते हरयेक जिनस रेवदंडाहून आणितील आगर पेठेहून रेवदंडा व घाटावर व कोकणात व हरयेक जागा नेतील तरी निमे जकाती कुल माफु करणे बाकी निमे राहील तेच घेणे म्हणऊंन निमे जकात कुल माफु असे बाकी निमे जकाती घेऊन निमे जकाती हरनिसबत वखारदार हासील घेऊन रेवदडेकर प्रभु **घुसाजी** व **सीरंगजी** व **फर्जदाजी संकरजी** व **बावाजी सेतवडकर** व बाजे प्रभु पेठेस वखारा घालून उदीम करितील ते हरयेक जिनस कोटातून आणितील

दिवाणाहून होईल ते सर सुमारी सदरहू उदमियावरी खापणी करणे म्हणऊन तरी सदरहु उदमियावरी सरसुमारी महसुलाची खापणी प्रो महसूल घेऊन——

पेठ मजकुरी गौळी राहातील त्यांस ढोरास चरगण दिधलें पाहिजे म्हणऊन तरी अलाहिदा कौल देऊन चरगणास जागा करून देऊन——

जकाती पेंठ मजकुरी वसाहाती करितील भाताची होडी बंदरी आणितील त्यांस बेस्मी रुके बुजरुकी ८६ कानु अहे ती निमे माफु करणे व तेच जकाती दुसरे यास भात अगर तांदूळ विकत पावीत करून देतील तरी निमे जकाती माफु करणे म्हणऊन तरी बेस्मी रुके ८३ माफु केले अहेती व भात अगर तांदूल पावीत करून फरोख्त करितील त्यांस सवाई जकाती माफु असे——

पेठ मजकूरचे खत्री **रेवदंडे**याहून व **चेंवलाहून** रेसीम खा करून पेठेस आणितील त्यास सवाई जकाती माफु करणे म्हणऊन तरी सवाई जकाती माफु आो पेठेस हरकोण्ही खुनी व खटनट व सिनल येऊन वस्ती करील त्यास तसवीस लागों ने दीजे म्हणऊन तरी खुनी व दफीना व चोरी सिनलकी खेरीज करून बाजे माफु असे

हवेलीचे लोक व कर्याती व कोकणीचे हरयेक जिनस पेठेस घेऊन येतील त्यास अयातीची जकातीची तसवीस लागो न देणे म्हणोन अयातीची जकातीची तसवीस लागो न देऊं——

पेठ मारीं आडानी व हरयेक कोण्ही अगर पेठेहून रेवदंडा व कोकणात व घाटावर व कर्यातीस नेतील व बंदरवाटेस नेतील तरी बरकुम कानुप्रो निमे जकाती माफु करणे म्हणऊन तरी रेवदंडेयाहून हरयेक जिनस आणितील अगर पेठेहून सदरहु जागां नेतील तरी हा वखारदार कदीम कमावीस होते त्यास सवाई बाद देऊन निमे जकाती घेऊन पटवे खत्री वसाहाती करितील ते पेठ मजकुरीं ताकुता विकितील त्यासी सवाई जकाती माफु करणे म्हणऊन तरी सवाई जकात माफु असे व तेच खेत्री चेऊलचे उदमी चेवयवी रेसमाचे विणकरीच्या हरयेक जिनस विकावयाबदल नेतील तरी जकातीची तसवीस लागों न देणे म्हणोन तरी जकातीची तसवीस लागो ने देऊं व तेच खेत्री रेसिमी जिनस फुरोख्त करितील त्यास पटवी दलाली माफु करणे म्हणऊन तरी पेठ मजकुरीं फुाो करितील त्यांस पटवे दलाली माफु केली असे

पेठ मजकुरीं नदाफु वसाहती करितील पिंजींक कापूस विकितील तेहीच विकणे दुसरेयासी पिंजीक कापूस विको न देणे म्हणोन तरी दुसरेयास कापूस विकूं नेदूं——

गोपालजी माहाजन ताफे चाटे यासी निमेदारी चालत होती दरम्याने फितरतीमधे भोगवटा तुटला आहे तरी हाली साहेब पेठ मामूर करिताती तरी निमेदारी चालविली पाहिजे म्हणऊन तरी भोगवटा तुटला आहे त्याचा उजूर

येऊन वस्ती करितील त्यास वेठ बेगार व जाज फर्मावसि लागो ने दीजे म्हणोन तरी सदरहु तसवीस न लगे

पेठेस वसाती जाली आहे साहेबी वसाहातीस जमीन दिधली आहे तर हर कोण्ही मसिदीचे निसबती अगर दिवाणातून जमिनीचे भाडें याची तसवीस लावितील ते तसवीस औलाद अफलाद लागों न देणे म्हणऊन तरी भाडेयाची तसवीस औलाद अफुलाद न लगे——

अस्टमी व **रोहे** व **बिरवाडी** तर्फ राजपुरीहून हरयेक जिनस केणे व भात व कापड व निलोतरी बंदरमार्ग व पाये-वाटेस देसींची रयेत व परदेसी आणितील त्यास अयातीस जकातीचा तसवीस लागो न देणे म्हणोन तरी बंदरमार्ग व पायेवाटेस आणितील त्यास जकातीची तसवीस न लगे——

पेठ मजकुरीं सदरहु खुम येऊन वस्ती करितील तरी बारा सालेंवरी दिवाण देणें महसूल पटी व हरयेक बाब तसवीस लागों न देणे बारा सालें जाहालियावरी पेस्तर दिवाणचा महसूल ताफेदार व जरीबदार त्यांचे जैन जोन पाहोन मोहीन करणे म्हणऊन तरी बारा सालेंवर महसूलपटीची तसवीर न लगे पेस्तर बारा सालें जालीया-वरी उदीम पाहोन महसुलाची मोहीम होईल तेण्हे प्रो देणे——

पेठ मजकुरीं आपलाले आवाडामधे हरकोण्ही झाडमाड लाविंतील त्यास महसुलाची व प्रभावलेची तसवसि लागों न देणे म्हणोन तरी झाडमाडास महसूल व प्रभावलीची तसवसि नलगे——

न करणे सालाबाद निमिदारी चालली आहे तेण्हेप्रो चालऊं——

निलोत्री पेठेस आणितील त्यास वाणगी व जकातीने घेणे म्हणऊन तरी वाणगी व जकातीची तसवसि लागो न देऊ——

विलायेतीमधून पेठेची रयेती भात व नाचणी व वाण व हरयेक जिनस आणितील त्यांस जकातीची तसवीस लागो न देणे म्हणोन तरी जकातीची तसवीस न लगे——

दाउजी रेखोजी सेटये कांसार बोगार पेठेस वसाहाती केली आहे त्यास दिवाणीचे हरयेक बाब सालाबाद तसवीस लागों न देणें म्हणऊन तरी सालाबाद प्रमाणें रवेस असेल ते चालेल——

कृस्णाजी माहादेऊ देशाई मामले **मुर्तजाबाद** पेठ मजकूरची माहाजनगी व कुलकर्ण दिधले आहे त्यास जे काही हासील उदीम करितील त्यास चौथाई जकाती माफु करणे म्हणऊन तरी चौथाई जकात माफ करणे

आपाजी ताउजी देसाई व देस-कुलकर्णी मामले **मुर्तजाबाद** यासी पेठ मजकुरींची चौघलिकी दिधली आहे तरी जो काही उदीम करून हासील करितील त्यासी चौथाई जकाती माफु करणे म्हणौन चौथाई जकाती माफु असे--

देवचंद साऊ यासि पेठ मजकुरीचे सेटेपण फर्माविले आहे तरी जो कांही उदीम करून हासील करीतील त्यास निमे जकाती माफु असे म्हणऊन तरी

पेठ मजकूरचीं रयेयेतीमधें हरकोण्ही चोरी व सिनलकी व खून व दफीना करितील तरी त्याचा गुन्हा पाहोन दंड घेणे म्हणौन तरी गुन्हा पाहोन दंड होईल

पेठ मजकुरींच्या हदा बीतपसील—

पछेमेकडून विठो-जी व गोविंद पान-सारा याचे घरापासोन खेरीज माणिक चौक तहद हिंगुलाजेचा डोंगराचे तल	पूर्व हद बांदिस्त अंबराई दिमत देशाई तहद डोंगराचे तले
उतरेहद सोमेश्वराचा मार्ग तहद सराई	दक्षेण हद बंदर खाडीमार्ग

सदरहूप्रमाणे हदांची मोईन करून देणें म्हणौन तरी सदरहुप्रमाणें हदा चो मोईन करून दिली असे

चेउलाहून व रेवदंडाहून व नवे नगर अगर कर्याती व हर येक जागां तल-कोंकण व बालाघाटी व हरयेक जागा-हून कर्जदार कुल येऊन पेठ मजकुरीं वसाहाती करितील त्यास कर्जाचा तोसीस साले पांच ५ ने देणे पांच सालें जाहालियावरी मवसर पाहोन उगवणी करवणे म्हणऊन तरी पांच सालेवरी तोसीस नाही पांच साले जाहालेयावरी औवजासारिखी उगवणी करणे

रेसीम व खुमास व हरयेक जिनस आणि तील त्यास निमे जकाती घेणे

पेठ मजकुरींची संचणी व हरएक दिवाणकाम सेटे व माहाजन व चौगले मिलोन येक सवादे चालवणे म्हणऊन तरी सदरहु प्रो रवेसीने चालवीत जाइजे

पेठ मजकुरीं वसाहातीची कुले हरयेक जिनस पेठेमधे खरीदी फरोख्त करितील त्यासी जकातीची तसवीस लागो न देणे म्हणौन तरी जकातीची तसवीस न लगे--

पेठ मजकुरींचे लोक नवें जाहाज करून अमदनी व रफ्तानी करितील त्यास निमे जकात घेणे म्हणऊन तरी सदरहूस जकाती निमे प्रो घेउनु

म्हणऊन मालूम केले बराये मालुमाती खातीरेसी आगून बाा मकसूदनामा सदरहूप्रमाणे कौलनामा सादर केला असे बेशक होऊन पेठ मजकुरीं दुकान बंदिस्त चिरेबंदी इमारती करणे व घरें व वाडे हदमहदूदप्रमाणे इमारती करून पेठ मजकूर मामूर करणे बारा सालें जाहालियावरी महसूल व पटी हरनिसबती विलायेती जे मोईन

करून देऊं तेण्हेप्रमाणे देणे पेठ मजकूर मामूर करणे कोण्हे याचे काही मुलाहिजा न करणे कौल असे

तेरीख २० रोज माहे सावान

ले. ४
चौल–अधिकारी

श्री

दाखलेपत्र **परीट चेऊलकर** याचा कायेदा गावाकडे
पायघड्या कोन्ही घातल्यास
——— लाहारी ४
१ जवण
४ लाहारी
मडप कापडला असता
——— लाहारी ४
४ लाहार
१ जेवण

सुद्र जातीकडे लग्न जाहल्यास नवऱ्या मुलास झगा मुडासे द्यावे लाहारी २

सुद्र जातीकडे लग्नसमयी गाणे गावे लाहारी
१ लाहारी
१ जवण

दसऱ्याचे दिवसी जमीदार याजकडील सिरपाव दर आसामी जवळून
१ देसाई १ अधिकारी
१ देशकुलकर्णी
१ माहाजन
१ पानसारे
१ चौधरी
१ सेटे कासार सोनार
१ नाईकवडे
१ जोसी उपाध्ये
१ काजी
१ मुनसी

सुद्र जातीकडे लग्न जाहाले तर पान्हा मोडावन—
दर लग्नास— लाहारी २
००= तावूल
जवण

दसरा दिवाळी आरती वोवालण सजगणी येक १

नवऱ्याकडील चिरगुटे धुपट दिल्ही लाहारी ३
१ नवरीकडील लाहारी
२ नवऱ्याकडील
—
३

मुद्दाधि शेर ! याजकडे
२ दीपावली आरती लाहारी
५ नारली पौर्णिमा नारल
१० पानाच्या पट्या
—
घरपटी पाल

ले. ५
चौल–अधिकारी

श्री

यादी वौषावळ **सिलोत्री** व **कुलकर्णी** तर्फ **खंडाळे** प्रांत **चेऊल** व **खार** **पेझारी** तर्फ **श्रीगाव** व खारी सिलोत्री तर्फ श्रीगाव व.........

मूळ पुरुष सदक प्रभु यासी पुत्र

१ रायाजी सदक प्रभु १ विनायेक सदक प्रभु १ आंताजी सदक प्रभु $\overline{३}$

पौ दोन पुत्राचे निर्वौश जाले ते–– १ रायाजी सदक प्रभु १ विनायेक सदक प्रभु $\overline{२}$

आंताजी सदक प्रभु याचा वौष आंताजीस बायेका २

प्रथमचे बायेकोस पुत्र दोन		दुसरे बायेकोस पुत्र	
वडील	धाकटे	दामाजी अनंत	बाळाजी अनंत
...जी आनंत	रामजी आनंत	१ वडील	१ धाकटे बंधु
यासी संतान नाही	१	यासी पुत्र	यासी पुत्र
नकल जाली.	यासी पुत्र	बापुजी दामाजी	पांडुरंग बाळाजी
	बाबाजीराम(?)	१	१
	१ १ $\overline{२}$	यासी पुत्र	यासी पुत्र
	यासी पुत्र	त्रिंबक बापुजी	बलवंतराव पांडुरंग
	जिवाजी बाबाजी	हाली हिंदुस्तानात आहेत	१
	१		यासी पुत्र
	१		१ नारायण बलवंत वडील
	१		१ केशवराव बलवंत धाकटे
	यासी पुत्र		$\overline{२}$
	१ बलवंतराव जिवाजी वडील		
	१ नारायणराव जिवाजी धाकटे		
	$\overline{२}$		

श्री

यादि छातिसीकर **कुलकर्णी** याचा घरटा प्रथम पाखाडीत होता व वाडी होती त्याचा नाव पाहून शोध पाहावयाचा उपनाव गुप्ते

१ गोविंद् कृष्ण याचे पुत्र--१ कृष्णाजी १ रघुजी १ मुरारजी $\frac{}{3}$

१ रघुनाथजीचे पुत्र--१ रायाजी १ मल्हारजी १ अंताजी $\frac{}{3}$

[कान्होजी आंगऱ्यांचे दिवाण रघुनाथजीचा वंश]

ले. ६
चौल-अधिकारी

श्री

कानु जकात माहाल तरी ठेका **शाहाबाज** तो **श्रीगाव** मामले **चेऊल**

ठेका माहाल मजकुरी **पेणेस** माणूस जाईल यासि दर माणसास घेणे बा रुके ०५

पेणेहून माणूस येईल त्याचा झाडा घेऊन जकातीचा जिनस असेल त्याची जकात घेऊन जाऊं देणे

बंदी व गुलाम व म्हैस व गुरें मा मजकुरीं खरीदी फरोख्त होईल त्यास खरीददारापासून घेणे——

बदी व गुलाम दर नफर लाहारी ५ — बसक लाहारी १०

म्हैसीस लाहारी २ — खुलगेयासीं लाहारी १०

खुमास——

सिती दर गजे रुके बुा—— ०५

घटी व अस्ट पुतली दर गजे बुा रुके ।६

पाटांव दर गजे बुजरुक रुके लाहारी ।॥

ताफता हरजिनसी दर गजे बा रुके ०६

खारां व मुसदर दर गजे बुा रुके ०४

टोपीया मखमाली दर टोपीस रुके——बुा ।

तरवाराचा बईल यासी दर बैल यास घेणे टका——१०

घोडेयासी मा मजकुरीं तरी वोलांडा होईल यासी घेणे

निकालु पइसा-लु यासि चौथी पाये घेणे—— — पैसालु घरघोडेयासी घेणे लाहारी १

विश्वा गुरास तरी वोलाडा जाईल येईल यासी निकालु पइसालु घेणे लाहारी

म्हैसीस लाहारी ।॥ — बईल व खुलगा यासी टके ।६

पतांबर——

बुा दरगजे रुके टका १ — खुर्द दरगजे टके ।॥

फुलपगर दर गजे रुके ०९

सखलाद——

पुर्तकाली दर गजे रुके ०९ — सखलाद लाहुरी दर गजे रुके ।

टोपिया लाहुरी——

टोपी बुजरुक दर टोपीस रुके ०४ — खुर्द दर कोडीस रुके ।

रेशम दर सेरे रुके ०४

कद रेसमी दर कदास लाहारी १॥

कापड व घोघडिया——

गोदडी सुती व रेसमीस लाहारी ·॥·

घोघडीया दर पटीस

बुा ३ खुर्द ४

यासी जकात घेणे निकाळु

दर बाटीस रुके पैसाळु दर बाटीस रुके

०६ ०८

कापड धोवट सेले व कोचकीया व हर जिनसी कलियाणा भिवडी तर्फेहून आणिती त्यास दर गठलीस टका—१०

गोणपटास दर गजे रुके ०१४

काटानी जिनस——

गहूं हरभरे

मूग तुरी

वाटाणे कुरुद

यासी दर गोणेस घेणे——

जकात टके वाणगी वजन

·॥६ ००१।·

तील——

गाजरे व मले दर गोणीस टके ·॥· चोखे व पाढरे दर गोणीस टके ·॥६

किता गंधान सवदा--

जाइफल जायेपत्री

माइफल सिलारस

हिगुल लवगा

मणसिल सेदूर

हिंग

यासी जकात घेणे रुके दर सेर--

यन जकात ०४

वाणगी ०२

०६

कापड दर पटीस

दागिने सेला कोचकी

१ १

पाटकी कणे

२ ६

गजें लुगडीं

४ २

धोत्रें लग

३ ०

यासी हासील घेणे

निकाळु बुा रुके पैसाळु रुके

०६ ०८

रगीत कापड चेउली तर्फेहून कालियानास व भिवडीस नेतील यासी दर घटीस रुके ०६

गठलीस लाहारी ·॥·

नवार पलगाची दर चाकीस रुके बुा ०१४

उडीद मसूर

वरणे लग

यासि जकाद घेणे——

दर गोणीस टके वाणगी वजन

।६ ००१।·

अफीन दर सेरे रुके--

जकाती ०४

वाणगी ०२

०६

गुल निकाळु व पैसाळु दर गोणी घेणे

जकाती टके वाणगी

·॥६ ००१।·

कापूर दर सेरे रुके ०९
पारा दर सेरे रुके ।·
मिरी दर गोणीस घेणे जकात लारी
१॥
वाणगी वजन
००१।·
फुटकल मणास घेणे––
जकात टके वाणगी ।·
०००१३
कांच दर बोझेया —
जकाती रुके वाणगी वजन
०१० ००।९
हळद दर गोनीस घेणे—
जकात टके वाणगी वजन
·॥६ ००।९
सुऱ्या खार दर बोझेयासी टके -।·
जिरे दर मणी घेणे जकाती—
टके ।· वाणगी ००।९
कील व चद्रुस दर मणे टके -।·
भंग दर गोणीस घेणे—
जकात टके वाणगी
·॥६ ००१।·
श्रीखड चदन——
अस्टागरी दर सेरे मल्यागरी दर सेरे
रुके ०४ रुके ०३
सुभधानी दर सेरे रुके ०२
पचकर्णी दर बोझे यासी घेणे——
जकाती रुके वाणगी वजन
०१० ००।९
तादुल व नागली निकाळु व पैसाळु
दर गोणीस टके
भात—— ।·

काकवी पाणमोडी दर सिरभारीस घेणे
जकाती रुके वाणगी
०१० ००।९
चिंच दर बोझेयास––
जकाती टके वाणगी
०१० ००।९
मेथी दर गोणीस घेणे
जकात टके वाणगी
·॥६ ००१।-
केसर दर सेरे टके ·॥३
चोल व मजिस्ट दर गोणीस निकाळु
व पैसाळु घेणे—
जकात टके वाणगी
·॥· ००१।
कल्हे व बेगड दर सेरे रुके ०४
पतग निकाळी पैसाळु दर गोणीस
लाहारी ·॥·
लसून दर गोणीस घेणे—
जकात टके वाणगी वजन
·।६ ००१।
धाइटीची साल दर बोझे यास रुके०१४
खारखा—
दर मणे लारी वानगी
·।· ००।९

मा मजकुरी खरेदी करून परमुलकास फिरगाण व पणवेलीकडे नेईल त्यास घेणे दर मुडेयास रुा पयता लारी ४

बीजाची पटे पैलाकडून आपले तर्फेस आणील त्यापासू[न] घेणे रुके०६ आणिक काही नाही कुलवी मा मजकुरी भात खा करितील यास घेण——

तलपतदार मा मजकुरी दर मुडे यास रुके ०९	दर मणी उद्मिया-पासून दर मुडे यास टके ।६

कुलबिया पासू[न] फसकी भात घेणे पाइली ००४

किता जिनस——

पलंग व कदिलें यासी घेणे

पलंगास	कदिलास	तबकें
रुके ।॥	रुके ०१०	बुा रुके ।।
		खुा कचज रुके ०५

कणिया बाइकांच्या केस उकलावयाच्या मा मजकुरीं आणितील त्यासी घेणे जकात दर कोडीस वाणगी फणी

रुके ०१० १

येण्हेप्रा घेणे—

बुरुड काम——

सुपें दर वोझे यासी घेणे

जकाती रुके ०१० वाणगी सूप १

किता जिनस——

कळीकडे निकाळु पैसाळु

गलबतास	वाणगी	डोईवोझे यासी
जकात लारी	५	जकात रुके
३।॥।		०१०

पैलीकडून भात खा करून आणितील त्यास खादारापासून दर मुडेयास घेणे—रुके ०९

भात फसकी——

गलबतास	होडीस
पाइली	पा
००८	००४

भात खरीददारापासून

तलबतदार	परदेसीं
मा भारा	भात खा
पासून या	करून नेईल
माफ वण	त्यापासून
रुके ०९	रुके ।६

पेटियासि घेणे——

हडपा मोटा	पेटसि लारी
दर लारी	।।
।॥।	
हातपेटीस	गग
लारी ।।	०

वोढणे लाकडे दर वोझेयासी रुके १०

बाबु कांबीट मा मजकुरी खादार आणितील यासि दर वोझे यासि—

जकाती रुके वाणगी बाबु

०१० २॥

नारल दर वोझेयासी घेणे जकाती—

जकाती रुके वाणगी

०१० नारळ १

जकाती खुा
रुके १० वानगी
गळीगडे
३

फणस दर वोझेयायासी
रुके ०१०

इडें व फहिरे दर वोझेयासी
जकाती रुके वाणिगी नग
०१० २

ऊस दर हजारे निकाळु पैसाळु——
जकत लारी वाणगी ऊस
१॥· १०

नाही ? व भाणे कालण आणितील
यासी घेणे दर नगास
नाहीस रुके भानास रुके
०५ ०१०

सूत दर वोझ्यास घेणे
निकाळु पैसाळु——रुके ·॥·

ताग दर वोझे यासी
जकाती रुके वाणगी वजन
१० ००१९

खुर्दा निकाळु पैसाळु नेतील आणि-
तील त्यांपासून दर वोझेयास घेणे——
रुके ०१०

साबुन दर वोझेयास——
जकाती लारी वाणगी वोळी
०४ १

सकतानीस जकात
रगात रुके होडीस रुके
०४ ०२
हिरवीस रुके भिकासानीचे
०१॥ पानास रुके ०१

केलीं दर वोझेयास——
जकात रुके वाणगी केलीं
०१० ५

पाने नागवेलीची दर वोझेयासी——
जकाती रुके वाणगी पाने
०१० १२५

कादे दर गलबतास खाादारापासून
पाग ? लारी वाणगी मण
१॥ ०॥·

कादे खाादारापासून दर गोणीस
टके ·१३

अलें निकाळु पैसाळु दर वोझेयासी
घेणे—
जकाती रुके वाणगी
०१० ००१९
गोणीस
जकाती रुके वाणगी
·॥६ ००१।·

माजरे व लव्हे यांचे दर वोझेयासी
रुके ०१००

भात नातनी माा मजकुरीं येतील
त्यास घेणे—
हाादारापासून पाग
गलबतास गलबत खुर्द
बुाा रुके १॥ टके ·।·
खाादारापासून नातनीस लारी ·।·

सरा पैलीकडे नेतील दरमणास घेणे—
जकाती रुके वाणगी रुके
०८ ०४

आधवड चाभारी दर नगास रुके०१००

जालें कोलीयाची पैलीकडे नेतील
त्यास घेणे
जालास रुके होडीस रुके
·।· ·।·

लाख दरमणे घेणे——

जकाती लारी वानगी वजन

।॰ ०॰।९

मासली जिनस——

मासे बुा दर वोझे यास घेणे

जकात रुके वाणगी मासा

०१० १

मासे व बैल खारे जिनस आणितील यास दर कोडीस खोदरापासूनन लारी ॥॰ घेणे वानगी माही खा दारापासून घेणे——

तारु बुा	वानगी	जकात	वाणगी
लारी ॥॰	२००	१	१००

किता जिनस——

गुलाचें तारूं येईल यास घेणे खा-दारापासून——

तारूं बुा		तारूं	खुर्द
पाग	वाण	पाग लारी	वाणगी
लारी	गी	१	००५
२	गुल		
	०।॰		

लाहान तारूं असेल

यास नजरे मण पाहोन

जकात घेणे——

खरीददारापासून दर वोझेयास रुके ०१०

मा मजकुरी कालवडे काढितील यासी रुके ०९

मा मजकुरी नवे तारूं बाधितील अणि विकतील त्यासी खरीददारांपासून दर सदे लारी घेणे ५

डोलीस लारी असूस टक्के

१ ०५

बईल दर वोझेयास घेणे—

जकात लारी वाणगी

रुके ०१० २५

खार व खडा बईल व खुलगा धरून नेईल यासी जकात घेणे—

तकाती लारी वाणगी बईल मासे

रुके ॰॥॰ १२२ २

कुटा केरिया दर खडीस जकात रुके ।०

बोबील हर जिनसी मासली आणून विकतील यास जकात नाही वाणगी माल पाहोन घेणे.

पांईपोस मोचेकरी याचे पेटारीस यास घेण लाहारी——

जकात लारी वानगी जोडा

१ १

मा डोलवी गाव खडणी दर सालिना घेणे लाहारी १६

गैर महसूल मा मजकुरीं होईल यास घेणे लारी अडीचसें पावेतों घेणे——

लारी २५००

महसूल————————

माहाल मजकुरीं शाहाबाजेमध्यें वराडे होतील त्यास घेणे दर वोऱ्हाडात लारी——१

कानडे याची पेंठ मा मजकुरीं श्री-गावीं येऊन राहील त्यास जकात घेणे—— ३ घेणे

घोघडी पटीस घा खुर्द ४

३

भाग मासा कोलियापासून घेणे लारी
१० भाग मासा
५ सीदर
१५
१

ताके सिंवाराचे आणितील त्यास घेणे——

जकात रुके दर ताकेयास
·।· वाणगी भारा १

वीरांची पेठ येईल यास घेणे

बकरीस रुके खुलगे यास
०५ लारी १
म्हसीस लारी
२

काबाडी गलबतें लाकडे भरितील यास घेणे——

गलबत बुा लारी गलबत खुर्द
३ लारी २

होडें लाहान नजर मानम करून घेणे जकात

भडारी माडी घेऊन येतील यास घेणे
घाघरीस कावडीस दर
दर माहे टके माहे रुके ·।६
०९
हमाल ! लाहारी ६०
ठाकुरी लाहारी ६०

किता जिनस——

खारखास घेणे दर गोणीस
लाहारी वाणगी वजन
१ ००१।·
दर वोझे यास
जकात रुके वानगी वजन
·।· ००।९

गेंज घटीस धोत्र ३
४ कोचकी १
पाटगां २ लुगडीं १
सेलापटी १

दर पटीस रुके घेणे ०८

माहाल मजकुरीं मीठ खा करून नेतील त्यास दर गोणीस रुके ·।· घेणे

खाजूर—— दरगोणसि
जकात रुके वाणगी
·॥· ००१।·
वोझे यास दरमणे
लारी रुके वाणगी
०१० ००।९

लोखड——

दरमणे लाहरी टाकिया कोडीस
·।· टके ·।·

तबाखु दर बैलास निकाळु पैसाळु
पैसाळु मणास निकाळु टके
लारी ·॥· ·।·

अबीर व गुलाल दरमणे वाणगी——

जकाती रुके	वाणगी	बैलास	वोझेयास
।·	००।९	००१।	००।९

खोबरे दर वोझे यास——

जकात लारी	वाणगी वजन
।·	००।९

माहाल मजकुरी कानडे याची पेठ पोईनाडी येऊन राहाले रोज ३ जकात घेणे पिटी सदगला ?

घोघडी बुा	घो खुर्द
३	४

गजे ४	धोत्रें ३
पाटकीं २	कोचकी १
सेला १	लुगडे १

यासी घेणे दर धटीस धटी रुके घेणे ०८

[एकूण जोडीव सात कागद; त्यांतील पाच पाठपोट लिहिले आहेत.]

ले. ७
वळण-कालगुडे

श. १५६६ पौष वाा ८
इ. १६४५ जाने. १०

(गोल फारसी शिक्का) असल बरहुकुम नकल

कौलनामा अज दीवाण किले **राहेर** ताा मुकादम व रयानी मौजे **वालण** बुा ताो **बीरवाडी** सुाा खमस आर्बैन आलफ कारणें दिल्हा कौलनामा ऐसा जे तुम्हाबावे आदकारी ताा मजकूर दौलत पेस केले जे मौजे मजकुरास दर साल नुमर दर टकेस टके ४॥ कौल दिल्हा होता त्यास साडेसात टके पडिले त्याकरिता रयान बेदिल होऊनु संचणी रयान घेत नाही साहेबी ०॥।· सन सीत आरबैन आलफस दर टके रुपये ५० पाच कुलसाल नुस ? माहासूल वर खर्चपटी वर बाजे बाब दणे म्हणौनु तरी दौलत पेश आधिकारी खातीरेस आणउनु दर टकेस टके ५ पाच प्रमाण कौल दिल्हा असे कोणे बाबे आंदेशा न करिता खातर जमा करून मौजे मजकूर कीर्द मामुरी करणे सुखी राहीजे

(फार्शी शिक्का)

(फार्शी मोर्तब)

तेरीख छ २१ माहे जिलकाद

[सदर नकलेचें मूळ अस्सल पत्र अत्यंत जीर्ण व फाटक्या स्वरूपांत, रुजु पाहण्याचे वेळीं दाखल केलें होतें.]

लें. ८
वाळण-कालगुडे

शं. १५६७ पार्थिक भाद्र० शुा ६
इ. स. १६४५ आगस्ट १७

(फार्शी
अष्टकोनी
शिक्का)

अज दिवान किले **राईर** ताा पारधीयानी व रयानी मौजे **वालण बुा तर्फ विरवाडी** किले मजकूर सुाा सीत आर्बैन आलफ तुम्ही पारधी करून हराजिनसी जनावरे मारिता त्यासी खोताचा लाजीमा आहे मागील पाऊसानी सालाबाद आसे ते मुकरार याकरिता दिवाणामधी आणिता नये याबदल **विठो...पाटील** मौजे मजकूर याची मन्हामतो करून देत जाणे दर हर साल मिशोलीचे उजूर न करणे तालिक लेहून घेउनु आसल मिशाल पाटील मजकूर परतून देणे (अष्टकोनी मोर्तब)

(अष्टकोणी
फार्शी
शिक्का)

तेरीख ५ रजेब

[मूळ अत्यंत जीर्ण, नकलेच्या व मुळाच्या साह्यानें उधृत केलें कागद]

लें. ९
वाळण-कालगुडे

शं. १५७० भाद्र. शुा ८
इ. १६४८ आगष्ट १६

(फार्शी शिक्का गोल)

अज दिवाण किले **राईर** ताहा **विठ पाटेल** वा **नागोजी घेरोसा** मौजे **वालण** बुा सुाा सन तिसा अर्बैन अलफ बीर जोगी याचे सेताचे अहवाल खातीरेसी आणणे अहे तरी तुम्ही व मोख्तसर ४ चौघ कुणबी सवे घेउनु हुजूर येइजे माो (गोल शिक्का)

तेरीख ६ शाबान

(तुकाराम झुरु कालगुडे वाळण बुद्रुक-संग्रहांतील)

ले. १०
चौल–अधिकारी

श. १५८२ पौष शुा १४
इ. १६६१ जाने. ४

(कांहीं भाग फाटून नष्ट)

उरुफ चेऊल ... ...

सुबेदार नामजाद **तलकोकण** नमस्कार सुा इहिदे सितैन अलफ अज उहुदी साल मजकुरु व बाकीपैकी दर वज बदल तश्रीफ **आपाजी ताउजी देसाई** देसकुलकर्णि मामले मजकूर पेसजी सुबा माची **परबलगड** येथे देसक आले होते यासि लुगडी तश्रीफा दिधळिया आपाजी मा देसाई व देसकुलकर्णपणाच्या दोनी तश्रीफा ... ... दुसरी तश्रीफ ते वख्ती हाजीर नव्हती येकच दिधली आता दुसरी तश्रीफे बदल होनु ·ııı· पाऊण मामले मजकुरी देविला असे आदा कीजे

तेरीख १२

जमादिलौवल

ले. ११
चौल–अधिकारी

श्री

श. १५९५ अ. भाद्र. वद्य ४
इ. १६७३ आगष्ट २१

मसुहुरुल अनाम **रामाजी माहाद** परभु हवालदार व कारकून मामले चेऊळ प्रती राजश्री **सिवाजी राजे** सुहुर सन आर्बा सबैन व अलफ **बालाजी ताउजी देसमुख** व देसकुलकर्णी मामले मा हुजूर मालूम केले की **आपाजी ताउजी** व आपण व **दादाजी** हे तिघजण येकवट असता वडिलाचा वितविशय होता तो तिघानी वाटून घेउनु निराले निघालो दाहा जण ग्रहस्त बैसोनु निवाडा करून आपणास लादावा लेहोनु दिल्हा तेणेप्रमाणे मागता आपाजी व दादाजी देत नाही व मोगलाचे काबिजातीस कितेक आपाजीने व बाबाजीने चोरी केली याबदल त्यास हुजुरून दंड बाधला त्या दंडाचे भरीस आपला हक नेतो आपणास येक रुका नेदी म्हणौनु मालुम केले तरी वडिलाचा वितविशय दाहा जणी वाटिला असोनु लादावा बालाजीस लेहोनु दिल्हा असोनु आपाजीस व दादाजीस नेदायां काय गरज असे या उपरी निवाडेप्रमाणे जे होईल ते बालाजीचे बालाजीस देवणे जो हरकत करील त्यास बवाजिबी ताकीद करणे व वतनाचे हकाची तकसीम हकहिसाची आपाजी व दादाजीकडे जितके

(श्रीशिवनरपति हर्षनिधान महादेव मति मत प्रधान)
[पांच ओळींची वर्तुळी मुद्रा]

सालाचीं याचे निाचा होईल तेही देवणे पेस्तर फिर्याद येऊ नेदणे छ १८ जमादिलौवल परवानगी हुजूर (मर्या

देयंविरा [तीन ओळींची
जते) मुद्रा]

[कागदामागें] सुरु सुद

ले. १२
देवळे-चित्रे

श्री

{ श. १५९८ श्रावण शुा १२
{ इ. १६७६ आगस्ट २५

असल मोजीब नकल

मशहुरल हजरत राजश्री **माहादाजी सामराज** सुभेदार व कारकून हाल व इस्तकबाल सुबा ताा मावल व कारकुनानी हाल व इस्तकबाल व देसकानी ताा **मुठे खोरें** प्रती राजश्री **शिवाजी राजे** सुहुर सन सबा सबैन व: अलफ मौजे **भोवली** ताा मजकूर येथील पाटीलकी पेसजी काा **दादाजी कोंडदेव** देशमुखापासून खरेदी करून सरकारची केली आहे ते सरकारदाखल चालते हाली पाटीलकी मौजे मजकूर **माणकोजी बिन बालोजी** ... ... खान यांसि याचे कदिमावर व... ... ... केली आहे पाटीलकी याचे दुमाला करणें पाटीलकीचे काम याचे हाते घेत जाणे पाटीलकी हक व इनाम कदीम कांही नाही येक बावले कामथ पासोडी रकमी कास गला मण ‑॥।~॥ साडेसतराचें जमा जाले असें राजभाग जमा होतों याबदल साहेबी माणकोजीस पाटीलकीबदल राजभागपैकी व नख्तबाबपैकी देविले असे दर साला बेरीज बि ताा

श्री शिव राजे
द्र हर्षनिदान । त्र्यं
बकसुत मोरेश्वर
मुख्य प्रधान
(चार ओळी लंबवर्तुळी मुद्रा)

गला कैली माहालपैकी राजभागपैकी देत जाणे खंडी ४

नख्तबाब वणी घर टका जमा होतो त्यापैकी दिवाणातोन हक म्हणौन आदा करीत जाणे टाा

खुर्दा———————टके

६०

... ...

च्यार व नख्त टके साठी इस्तकबील सालमजकूर सन सबापासून आदा करीत जाणे दर साला ताजा सनदेचा उजूर न करिता सालदरसाल हेच सनदेवरून माणकोजीस व माणकाजी मागे याचे आवलाद आहफादेस येणे प्रो चालवणें उजूर व इस्कील

कांहीं न करणे तालिक लिहून घेऊन असल परतोन देणे छ २५ जमादिलाकर परवानगी हुजूर मोर्तब सुद (मर्या
देयं विरा (षट्कोनी तीन ओळींची मुद्रा)
जते)
रुजु सुरुनिवीस

बार

दुलावणीवर मोर्तब सिक्याचे तरेचे आहे मोर्तबात आक्षरें विलसति लेखनावधि मुद्रा

सुरु सुद

[तुटक तेथें फाटलें.]

ले. १३ }
चौल–अधिकारी }

श्री

{ श. १६०१–२
{ इ. १६७९–८०

ताा

तह देणे हक देसक मामले **चेऊल** सुाा समानीन अलफ देसक मामले मजकूर यासी साल दरसाल दिवाणातून हक द्यावयाची मोईन केली आहे यैसियासी त्याचे निसबती दिवाणची बाकी अहे व हुजुरून खड केला होता तो पैका इगरेजास देविला त्याचे देणे इगरेजास देविले व बाकी व इगरेजाचे देणे याचा उसूल जाला पाहिजे नफर मजकुरासी.................ची बाकी व इगरेजाचे देणे वसूल व्हावा व त ......वर त गावे म्हणोन राजश्री **बहिरो त्रिमल** सरसुभेदार व **तिमाजी वेंकटेस** सुबेदार येही तह केला की देसकासी दिवाणातून हक साल दरसाल द्यावयाची मोईन आहे त्यापैकी दिवाणाची बाकी व इगरेजाची बाकी याची सिस्त केली ते साल दरसाल हकामधे द्यावे.......... त्यासी खावयासी द्या यैसी करारती करून साल दरसाल हक द्यावीयाच [करार केला] असे बीताा

[अपूर्ण]

ले. १४ }
चौल-अधिकारी }

श्री

{ श. १६०२–०३
{ इ. १६८०–८१

[कागदाच्या आरंभींचा भाग नष्ट. पहिला बंद अगदीं जीर्ण झाला आहे.]

......खातीरेस आणून तुम्हास कौल सादर [केला असे बीतपसील]

किाा कलम साल मजकुरीचा उसुलाची तहसील करोनु मामले मजकूर ... ... **सेख माहामद दिवाण**

किाा कलम साहेबाची काबीजात मामले.........वरी......म जाहाली तेणे करून ... क प्रजा गयाल होऊन

सरकार तलकोकण याचे बद्गीस देसक ... ... खक जाऊन ... ... मजकुराची ... ... यावरी ...... हेही रयेती ... अहवाल खातीरेस ...... मिया **अबदुल** बा ... ... मामले मा त्यासि बोलाऊन विल्हे करून दिधली आहे त्यापैकी ... ... बी ता छ २६ रमजान ... ... न घेतला ... ... जे काही रा ... ... याचा उसूल ता आखेरसाल घेतला पाहिजे म्हणून लिहिले ... ... गलाचे जमाब ... ... पैकी हिसेची बाकी राहिली असेल त्याचा उसूल आखेरसाल ता घेऊन मोर्तब सुद (पट्कोनी २ ओळी, शिक्का चंद्रसूर्य)

किा कलम मामले मजकुरी (ना)डी बाबत मुडे भाडारी ... ... ल वराई क बारव खु...... भाडारी व राई नारली व भेरली व ताड राई त ल प द टा हुरे गावगना.........जे ताडीबाबत कुल दूर केली आहे वैसे यास सालगुा **मिर्जा करीमबेग** दिवान......तेही सालगुा आखरसाली सदरहु बाबत दूर केली होती अमा उसूल होऊन गेला तो जमा जाहाला यावरी हाली सालमा कारणे **मीर सैद महमद दिवान** आले तेही सदरहु बाबत...करून बाद दिधले आहे तेणेप्रमाणे सदरहु बाबत बाद दिधली आहे तेणेप्रमाणे सदरहु बाबत बाद दि[ध]ली पाहिजे म्हणौनु तरी हाली कमाविसा मुले संचणी करिता जे साधेल ते घेऊन पेशजी मोईन होती त्याची निसबत न लगे मोर्तब सुद (पट्कोनी सिक्का)

जागजागा ...... या आ ...... गाव खराबा पड[ले आहे] ती अैसीयास ... .रमजान राहिली... ...... त्यापैकी ज्या गावी गयाल कुल [परागंदा] जाहाली आहे त्यावरी जे बाकी असेली ते बाद देऊन हाजीर कुलाची बाकी उसूल घेतला पाहिजे गयालीची निा खोतासी व बाजे कुलास लाविली न पाहिजे म्हणौनु लिहिले तरी गैरहाजीर कुले जेथे गेली असतील तेथे दाखऊन देणे त्याची बाकी त्यापासून उसूल करून घेउनु गयाल कुलाची निसबत हाजीर कुलासी न लगे मोर्तब सुद (०

मो र त

बसुद)

किा कलम पा मजकुरीचे गाव कर्तीयेक इजारदारासी होते यावरी साल मजकुरी **मीर सैद महमद दिवान** आले तेही देसक व रयेत खलक **कल्याणास** नेले मामले मजकुरीचा अहवाल खातीरेस आणून **मिया अबदुल** बाकी करोडी यासी बोलाऊन तह दिधला की सन १०८० सन इहिदे सबैना कारणे तमाम गाव अमानत ठेउनु अमानत सचणी करणे म्हणून तह दिधला आहे त्यावरून करोडी मामले मजकूर येही कुलगाव अमानत केले आहेती तेणेचप्रमाणे चालविले पाहिजे इहिदे सबैनाकारणे हजारदारासी हजारतीची निसबत लाविली न पाहिजे म्हणून तरी गावाचा अहवाल मनास आणून हजारती देऊन तेणेप्रमाणे उसूल...... मोर्तब सुद (पट्कोनी शिक्का)

किाा कलम मोगलाई अमलाची रवेश तरी साहेबा...जाहीरच आहे ते अमलामधे खर्च सादिलवार व दरबार-खर्च जाहाला आहे तरी त्याचे अमलाची पुरसीस केली न पाहिजे म्हणून तरी सादिलवार जाहाला असेल तो समजावणे तुम्हास निसबत न लगे मोंगलाई अमलामधे सादिवालवार व दरबार खर्च जाहाला आहे त्याची वाजपुस न करू मोर्तब सुद (षट्कोनी शिक्का)

किाा कलम मामले मजकुरीचे रयेतीस निपुत्रिक सालाबाद नाही थैसे-यास पेशजी साहेबाचे आमलामधे निपु-त्रिकाची तसवीस लागत आहे तेणेकरून रयेती लोक बेदि ...मुलुक खराबा पडत आहे यावरी मोगलाई अमल जाहाले यावरी तेही सालाबाद निपुत्रिक घेत नसत तेणेप्रमाणे दूर केले होते हाली साहेबी निपुत्रिकाची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तरी निपुत्रिक माफ केले असे निपुत्रिकाची तसवीस न लगे निपुत्रिक मरेल त्याची मवेसी त्याची कोण्ही असतील त्याचे हवाला करणे मोर्तब सुद (षट्कोनी शिक्का)

किता कलम मामले मजकुरी मिल-कतदाराच्या मिलकती खारीया व नवोदर व वाडिया व सिलोतरे आहेती त्याचे खावद कितेक सालमजकुरी आहेती व कितेक जागा जागा आहेती त्याचे मुतालिक मामले मजकुरी राहोन कमावीस करीत असतात यावरी पेशजी साहेबाचे अमलामधें मिलकतदाराच्या

किाा कलम पेशजी राजेश्री——साहेबाचे अमलामधे कितेक बाबती हकनाहक घेऊन जमा केल्या आहेत यावरी मोगलाई अमल जाहाले यावरी त्या बाबती दूर करून बाा सालाबाद वाजवी टका द्यावयाचा तह दिधला आहे तेणेचप्रमाणे चालत आहे हाली बाा तह मोगलाई चालविले आहे तेणेचप्रमाणे चालविले पाहिजे म्हणून तरी मोगलाच्या कमाविसेमधे बाबा दूर केल्या असतील त्या सालमजकुरी दूर केल्या असती मोर्तब सुद (षट्कोनी शिक्का)

किता कलम मामले मजकुरीचे मिरासदार देसक व सेटिये व माहाजन व चौधरी व वर्तक व कुलकर्णि व पाटेल व मढवी व बाजे मिरासदार याचा हक-लाजिमा व इसाबती देहे व सिलोतरे व वीर्ती वावेली पेशजी साहेबाचे अमलामधे लाबुद देउनु बाकी जमा करीत असती यावरी मोगलाई अमल जाहाला यावरी तेही बाा सालाबाद मिरासदाराचा हक मिरासदाराचे दुमाले केला आहे तेणे-प्रमाणे हाली साहेबी चालविले पाहिजे म्हणौउ(नु) तरी सालमजकुरी मोगलाही दुमाले केले ते केले सालमजकुरी तसवसि न लगे पेस्तर साला कारणे बाजे माहालीचे मिरासदाराप्रमाणे विल्हे करून मोर्तब सुद [षट्कोनी शिका]

किाा कलम मामले मजकुरी साहेबाची काबीजात आली यावरी राजेश्री ... ...**हबाजी नाईक उतेकर** येही केतीयेक रयेतीपासून उसूल करून घेतला आहे व हाली साहेबाचे वख्ती

मिलकती अमानत करून जाहाला हासील जमा करीत असती यावरी मोगलाई अमल जाहालेयावरी तेही बाा सालाबाद मिलकतदाराच्या मिलकती त्याचे दुमाले करून वाजबी टका हकहिसाबी घेत असती हाली साहेबी तेणेच प्रमाणे चालविले पाहिजे म्हणून तरी मिलकतदार खावंद हाजीर असेल त्याचे दुमाले करून बाजे रयेतीप्रमाणे त्यापासुनु दिवान देणे घेउनु............. त्याची मिलकत अमानत करून मोर्तब सुद (षट्कोनी मुद्रा)

किा कलम मामले मजकुरी किलेयाची वेठ बेगार हमेश्या पडते तेणेकरून कुणबी खलकाचा राहराबट होत नाही कितेक गाव वैराण पडतात म्हणून **मीर सैद महमद** दिवाण येही किलेयाची वेठ बेगार कुल माफु केली आहे हाली साहेबाची काबिजात आलियावरी वेठ बेगार घेउनु किलेयास नेतात येणे करून कीर्दीचा हगाम अतरतो कितेक कुणबी खलक पलोन जागा जागा जातात तरी साहेबी कीर्द आबादानीवर नजर देऊन वेठबेगारीची तसवीस दूर केली पाहिजे म्हणून तर हाली मसलतेचा वख्त आहे धामधुमीमधे वेठ पडते पेस्तर वेठीची तसवीस न लगे मोर्तब सुद (षट्कोनी सिक्का)

उसूल होतो आहे ते बेरीज आम्हास मजुरा दिधली पाहिजे म्हणून तरी मोगलाचे जमाबंदी पैकी बाकी असेल व हाली खडणी करून त्यापैकी उसूल आला असेल तो मजुरा देउनु हरयेक बाबेमधे मजुरा देऊन मोर्तब सुद

(षट्कोनी शिक्का)

किा कलम मामले मजकुरीचे मिरासदारास मिरासपटी सालाबाद नव्हती यावरी साहे[बाचे] आमलमधे पेशजी साल दर साल घेत असेती येणेकरून मिरासदाराचा अहवाल काही राहिला नव्हता यावर मोगलाई अमल जाहाला यावरी तिही साला आड येक साल मिरासपटी घ्यावी ऐसा तह केला आहे तेणेप्रमाणे साल गुा सन तिसामधे जमा जाहाली आहे ते साल मजकुराकारणे बादी दिधली आहे तेणेचप्रमाणे हाली साहेबी चालविले पाहिजे साल दरसाल मिरासपटीची तसवीस लाविली न पाहिजे म्हणौनु तरी सालमजकुरी मिरासपटीची निसबती न लगे पेस्तर सालाकारणे ... जमा हालीचे मिरासदारास ...... मोर्तब सुद (षटकोनी शिक्का)

लग०

सदरहूप्रमाणे तुम्हास कौल दिधला असे तरी तुम्ही बेशक होऊन सुखे येणे मोगलाई अमलामधे त्यास तुम्ही भेटोन ... ... ची तसवीस तुम्हास न लगे [दरी] बाब कौल असे मोर्तब सुद (षट्कोनी सिक्का)

तेरीख[1] ३ [1]माहे जिलकादी
जिलकाद[1]

[एकूण ५ कागद, कागदाच्या पाठीवर जोडांवर 'मोर्तबसूद' एक एक ठसा. 'मोर्तब सुद ' हें अक्षर भिन्न; बाकी मजकूर एक टाकी. मजकुरांत १३ मोर्तब षट्कोनी, आंत मेहरपी.]

ले. १५
चौल–अधिकारी

श्री

श. १६०७ माघ शुा ४
इ. १६८६ जाने. १७

अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये राजश्री **येसाजी अनंत** देशाधिकारी व लेखक प्रां **चेऊल** गोसावी यांसि .

सेवक **प्रल्हाद निराजी** न्यायाधीस नमस्कार सुा सीत समानीन अलफ **जिवाजी सजणाजी प्रभु** यामधें व **सूर्याजी विसाजी प्रभु** यामधें जिवाजी प्रभु याचे वतनी वाडी कसबे चेऊल पाखाडी पेठ याचा वेव्हार लागोन पे[सजी हु]जूर आले होते यावरून हर दो जणाची हकीकत मनास आणितां जिवाजी प्रभूने विदित केलें कीं सूर्याजी प्रभूस चेऊलची मजमू असतां आपली वाडी उतम देखोन आपले तक्षीमदारांवरी बलत्कार करून बसरी लारी सवासे दे[ऊन] जोरावारीनें खत करून घेतलें आहे त्यावरून सूर्याजी प्रभूस विचारितां विदित केलें की जिवाजी प्रभूचे तक्षीमदारानी आत्मसंतोसे वाडी विकत देऊन खत करून दिधलें आहे हे गोष्टीचे साक्षे आहेत व जिवाजी प्रभूचे तक्षीमदारानी आत्मसंतोषे वाडी विकत दिधली अैसी साक्ष त्यांची आणून देईन म्हणोन हुजूर कतबा लेहून दिधला यावरून **हरि सिवदेव** माजी देशाधिकारी प्रां मजकूर यांस व माहालींचे हवालदारांस व वतनदारांस पेसजी हुजुरून आज्ञापत्रें सादर जाली होती त्यावरून हरि सिवदेव माजी देशाधिकारी प्रांत मजकूर यांचें विनंतीपत्र व हवालदार याचे व देशमुख वतनदार यांचे विनंतीपत्र व जिवाजी प्रभूचे तक्षीमदारांची पत्रे हुजूर आलीं तेथे लिहिले आहे कीं सूर्याजी विसाजी प्रभु याणे बलत्कारे जिवाजी प्रभूचे तक्षीमदारापासून वाडी विकत घेतली आहे ती विनंतपित्रें बजिनस हुजूर आहेत त्यावरून सूर्याजी विसाजी प्रभु आणून मनास आणितां क ... ... त खोटा जाला जोरावारीने जिवाजी प्रभूचे तक्षीमदारांपासून वतनी वाडी विकत घेऊन खत घेतलें आहे अैसे तहकीक जालें अैसीयासी येकंदर राजश्री —— छत्रपती स्वामीचा तह कीं वतनदारांचे वतन विकत घेणारे घेऊ नये व देणारे देऊ नये जो विकत घेईल त्यास शास्त करावी गुन्हेगारी घ्यावी वतनदार होऊन जो आपले वतन विकत देईल

---

१ तीनहि अक्षरें भिन्नभिन्न.

त्यास जोर ताकीद करावी या गोष्टीने सूर्याजी प्रभूस वाडी विकत घ्यावयासी प्रयोजन नाहीं ऐसें जाले त्यावरून निर्वाह जाहाला की सूर्याजी प्रभूने जिवाजी प्रभूचे वाडीमधें झाड पेड जे लावणी लाविली असेल त्याची रास्ती किमत वतनदाराचे व भले लोकांचे साक्षीने जे होईल ते थैवज बसरी लारी संवासे जिवाजी प्रभूने सूर्याजीस द्यावे आणि इमारीतीचें घर व पाषाणी दांडे सूर्याजीचे **सूर्याजीने** आपले न्यावे दुसऱ्याचे वतनावरी इमारितीचें घर व वाडीस पाशाणी दांडे लावावयासी प्रयोजन नाही ऐसा निवाडा जाला वाडीची किमत करावयासी हुजुरून इतबारी मनुश्य यावे तों सूर्याजी प्रभु पलोन गेला म्हणोन पेशजी तुम्हांस आज्ञापत्र सादर जालें ऐसा निवाडा हुजूर जाला असतां अलाकड सूर्याजीने चेऊलची मजमू करून जाऊन जिवाजी प्रभूचे तक्षीमदार **विठोजी बापूजी** व **गोविंद नारायेण** यास लिगाड लाऊन बलत्कारें आत्मसंतोष वाडी विकत दिधली ऐसा महजर व पेसजी तकरीरा व बखैरा दिधल्या आहेत त्या कुल खोट्या ऐसा महजर करून देणे म्हणोन अटक करून बैसविले होतें त्यावरून विठोजी बापुजी व गोविंद नारायेण हुजूर फिर्याद आले म्हणौन हरदूजणाचे माणसास व जमानास तगादा लाऊन अटक केली आहे म्हणोन हुजूर कलो आले तरी विठोजी बापुजी व गोविंद नारायेण हुजूर आले असतां याचे माणसांस व जमानास अटक करावयासी काये गरज आहे वाडीचा निवाडा...... र जाला प्रा मज... चे हवाल-दाराचे व देशमुखाने विनंतीपत्रें हुजूर पाठविली असतां सूर्याजी प्रभु मनास माने तैसी लबाडी करितो जिवाजीचे तक्षीमदारास परागंदा केले आणि तुम्ही सुभेदार तमासा पाहातां आणि सूर्याजीची कोसीस करिता यावरून तुमची कारकुनी जाहीर जाली या गोष्टीचा प्रसंग राजश्री———स्वामीजवल होईल आणि सूर्याजी प्रभु लौकरीच नतीजा पावेल तरी तुम्हीं बेमुलाहिजा सूर्याजी प्रभूस ताकीद करून हाल खुद टेवणे व सूर्याजी प्रभूने तरफदारांस सागोन आकस कोसीने विठोजी यापुजी व गोविंद नारायेण याजवर वराना केल्या आहेत त्या तुम्हीं मनास आणून हक हिसाबी करणे गैर माकुल व हरकसी सर्वथा करू न देणे व विठोजी बापुजी व गोविंद नारायेण हुजूर आले आहेत यांचे माणसांस व यांचे जमानास येकंदर तगादा न लावणे छ २ रबिलौवल आज्ञाप्रमाण

असल पत्र विसाजी चन्हीकर यांकड असे

ले. १६
प्रतापगड--हडप

श्री

{ श. १६११ वैशाख शुा १४
{ इ. १६८९ एप्रिल २३

स्वस्ति श्रीराज्याभिषेक शक १५ शुक्ल नाम संवसर वैशाख शुध चतुर्दसी भोमवासर क्षेत्रिय कुलावंतस श्री **राजाराम छत्रपति** याणि राजश्री **बहिरजी नाइक घाटगे** दिमती रत्नशाला सेवक राजमंडल मुा किले रायगड यासि आज्ञा केली ऐसी जे राजश्री **नारोपंत अमात्य** यांच्या वस्ता **संगमेश्वरींहून रायेगडास** जाता मौजे

पेडावे ता **चिपोलण** येथे दांडगियानी लुटिल्या त्यांची वाजीपुसी करायासि खंडोजी गाड्या हुजरून पाठविला त्याणे वस्ता सापडिल्या त्या हुजूर आणिल्या त्या नजरगुजार करून त्याच्या त्यास दिल्या त्यांपैकी कलमदान सोनियाचे वजन तोले वार——— येकूण १ येक हुजूर वाडियात स्वामीने घेतले त्याचा मुबादला सोने रत्नशालेकडील देविले असे तरी सदरहु सोने रायेगडी रत्नशालेकडून पंतमाानइलेस प्रविष्ट करणे येविषी राजश्री **राहुजी सोमनाथ** यासि आलाहिदा आज्ञापत्र सादर असे अनमान न करिता सोने देविल्याप्रमाणे प्रविष्ट करणे जाणिजे

[नकल तत्कालीन आहे. मजकूर संपल्यानंतर राहिलेल्या कोऱ्या जागेंत कांहीं मोडींत थोडे बाळबोधींत सोन्यामात्याच हिसेब उजव्या अंगास लिहिला आहे. पत्राप्रमाणें तो वाच्य नाहीं.]

ले. १७
प्रतापगड-हडप

श्री

श. १६१३ ज्येष्ठ वा ९
इ. १६९१ जून १० पैवस्तगी १८ जून

राजमान्ये राजेश्री **हरि विठल मजंमदार** दिमती श्री———मुा किले **प्रतापगड** यांसि **रामचद्र नीलकट** नमस्कार सुा इहिदे तिसैन आलफ वेदमुहूर्ती **विस्वनाथभट हडप** हे पुरातन राजेश्री कैलासवासी स्वामीचे कारकीर्दीपासून श्रीचे पूजक आहेत यैसीयासी साप्रत दुष्ट संसर्ग काही येक दिवस जाला यानिमित्य पूजा राहिली भट गोसावी स्थलत्याग जाले प्रस्तुत प्रतापगड घेऊन श्रीची स्छापना केली ते समई भट गोसावी हजीर नव्हते पूजा चालिली पाहिजे म्हणून **माहाबलेस्वरकर विश्वनाथभट** यासि सागितली त्याणी ब्राह्मण ठेऊन पूजा चालती केली (त्याव)री विश्वनाथभट याणी आपले पुत्र **नीलकटभट** हुजूर पाठविले विश्वनाथभटास पूर्वीपासून कैलासवासि स्वामीने पूजा सागितली असतां दूर करता येत नाही या कारणे जेणेप्रमाणे पूजेचा मामला यांस होता तेणेंप्रमाणे करार केला असे तरी पहिलेपासून कैलासवासी स्वामीचे वेलेस जेणेप्रमाणे चालिले असेल तेणेप्रमाणे यांसी चालवणे आणि माभलेश्वरकर भटांस पूजेचा मामला सागितला होता त्यांला **पंडितरायाची** मुतालिकी देऊन श्री देवीस पुराणश्रवण करावयाची आज्ञा केली असे तरी वेदमुहूर्ती विश्वनाथभट माभलेश्वरकर जो ब्राह्मण ठेवितील त्यांपासून श्री देवीस पुराणश्रवण करवीत जाणे त्यांस जेणेप्रमाणे कैलासवासी स्वामीच्या वेलस चालिले असेल तेणेप्रमाणे चालवणे विश्वनाथभट वृध आहेत पर्वती राहातां अनकूल पडत नाहीं याकरितां त्याचा पुत्र नीलकटभट तेथे राहतील आणि श्री———ची पूजा करितील जाणिजे छ २२ रमजान पा हुजूर

पो पैवस्तगी छ १ सौवाल [पत्र एकाच अक्षरांत]

ले. १८ प्रतापगड-हडप } श्री { श. १६१४ श्रावण शुा ११ इ. १६९२ जुलै १४

नकल

राजमान्य राजश्री **हरि विठल** मुा मजुमदार दिा श्री यांसी **रामचंद्र निलकंठ** आमात्य आसीरवाद सुा सलास तिसैन अलफ वेदमूर्ती राजश्री **विश्वनाथ भट** पूजक दिा श्री याकडून प्रतीही श्रीचे पूजेस पंच्यामृत नैव्येद्य अैसे पुरातन नियत याणीच करावयाचा कैलासवासी स्वामींनें तह केला तसा चालत असता सांप्रत तुम्हीं उगाच खटला करून हर्षामर्ष करिता भट गोसावी यासी म्हणता की तुम्ही करू नका निमे आपण करून म्हणौन वर्तमान कळो आले तरी भट गोसावी यांसी तुम्ही कथला करावयास प्रयोजन काय पहिलेच कैलासवासी स्वामींनी तुमचा व विश्वनाथभटाचा व श्री कडील लोकांचा तह करून दिल्हा आहे त्याप्रमाणेच वर्तणूक करावी त्यांस कटकट करावयास गरज काय याउपरि पहिलेपासून विश्वनाथभट श्रीची पूजा पंच्यामृत नैवद्य करितात त्याप्रमाणे करितील तुम्ही अनकूलता करून देत जाणे पुन्हा बोभाट येऊ न देणे जे सेवा सागितली आहे ते तुम्ही करीत जाणे विश्वनाथभट यांस जे शेवा सागितली आहे ती ते करितील फिरोन बोभाट आला म्हणजे तुम्ही जाणा लिहिल्याप्रमाणे वर्तणूक करणे भट गोसावी याकडील पच्यामृतांची व नैवद्यांची आनकूलता करून देत जाणे पूजा करितील नैवेद्य करून श्रीस समर्पितील जाणिजे पहिले पासून चालत आहे तो तह तुम्हास ठाऊक आसोन कटकट करिता ते न करणे पूर्वापार चालत आलें त्यास आंतर पडों न देणे छ ९ जिलकाद परवानगी हुजूर

ले. १९ पोलादपूर-चित्रे } श्री { श. १६१४ अधिक भाद्र. शुा १ इ. १६९२ आगस्ट ३

(गोल सिका) असल बा नकल

स्वस्थि श्रीराज्याभिषेक शके १९ आंगिरा नाम संवत्सरे अधिक भाद्रपद शुध प्रतिपदा सौम्यवासरे क्षत्रियकुळावतंस श्री **राजाराम छत्रपति** याणी वेदमुहूर्ती **कृष्णंभट आचार्य** याचे पुत्र **गोपाळभट आच्यार्ये** काषप गोत्र आस्वलायन सूत्र

सिका सिका

वास्तव्य स्थल कसबे **पाली** प्रांत **चेऊल** यासी दिल्हे वृत्तिपत्र अैसी जे तुम्ही **चंदीचे** मुकामी स्वामी संनिध येऊन विदित केले की आपण कुटुंबवछळ आहो योगक्षेमास वृत्तीचा आधार नाही यास्तव वृत्तीउदेषे कर्नाटकात स्वामीपासी आलो आहे तरी आप(ला) योगक्षेम चाले अैसी वृती दिधली पाहिजे आपण स्वामीचे अन्न भक्षून स्नानसंध्यादिक सत्कर्मे आचरोन महाराजास काळत्रयी कल्याण इछून सुखरूप आसो

म्हणौन विदित केले त्याजवरून मनास आणिता तुम्ही बहुत भले विद्यावंत सत्पात्र देखोन श्रीपरमेश्वरप्रीत्यर्थ नूतन इनाम धारापूर्वक मौजे कवेले तर्फ पाली सुभा प्रांत चेऊल देहे १ येक कुलबाब कुलकानु हाली पटी पेस्तरपटी जळ तरु पाशाण निधि-निक्षेप पडिले पानसहित खेरीज इनामदार व हकदार करून चतुःसीमा भूमि पूर्वील मरयादेप्रो गाव धारादत करून दिल्हा असे हा गाव तुम्ही आपले स्वाधीन करून घेऊन तुम्ही व तुमचे पुत्रपौत्रादि वंषपरंपरेने अनभऊन सुख स्वामीस आसीरवाद इछून असणे यासी कोणी अन्यथा करील त्यास धरमशाश्रीची वचने व श्लोक येकेव... लोके सर्वे शाके व भुभुज्यां । न भोग्या व परग्राह्या विप्रदत्ता वसुंधरा ॥ १ ॥ दान-पालनयोर्मध्ये दानात् श्रेयोनुपालनं । दानात् स्वर्गमवाप्नोति पालनात् अच्युतं पदं ॥ २ ॥ इंद्रमीछति ? चांडाली किमिदं पच्यते वृथा । स्वमांस्वसुर व्यासीत्का कपालेन चिता-ग्निनां ॥ ३ ॥ देव ब्राह्मण वित्तानि ना...पयति हरन्ति ये ॥ तेषां पादरजो भीत्वा चर्मणा पिहिते यया ॥ ४ ॥ हे पातके स्मरोन तुम्हास गाव इनाम सुरक्षित चालवितील जाणिजे निदेश **समक्ष** (मोर्तब)

सदरहु सनदेची वहिवाट हाली गणेश रघुनाथ आच्चार्ये पुरुष चवथा

[कागदामागें] समत

समत

तेरीख २९

जिलकाद सुा

सलास तिसैन अलफ

बार सुद सुरु सुद बार

ले. २०
चौल–अधिकारी

श्री

श. १६१४–१५
इ. १६९२–९३

नकल

जाबिता हक व लाजिमा व इसाबती व इनामती व कानुकाइदा **आपाजी माहादाजी** अधिकारी मामले **मुर्तजाबाद** उर्फ **चेऊल** सुा सलास तिसैन व अलफ नकद लारी

३५१॥· मोहतर्फा
२२७ जराबु
५७१ बागाईत
२३६॥ आगर उदमीणी
६०८ भाडे दुकान व बकाल

१६००	कोरडकसी
१०००	कोली कोलवडी
३५५०	डाकी स्थल
३४९	नुरी स्थल
१८७	जोईसी
१८८॥।	तरखंड
१२८०	किताबती
३२॥·	निमकागर
२७	कोलसेकरी
६६	राई
२१६	भूतपरोसी
२६६	हजाम
२३७	धोबी
२६९	सोईन
२१४	पत्रकेणी
१३५	ठाकुरी
१६४९॥	कापरुपाई
१०	नउदर मौजे कोलेगाव तो झिराड
६००	छत्री मौजे ढवर तो खाडाले
७२४७॥।	

मीठ कुडवी———खेडी

१ मिठागर वानेले

·॥· मिठागर वणवली

·॥· मिठागर मांडवें

·।· मिठागर सालाव

१ मिठागर खार खोपण

३।

इसापती गांव———

१ मौजे ढवर तो खाडालें कदीम

इनामती———

२ वाडिया

१ वाडी पाखाडी उसवी

१ वाडी पाखाडी आभेपुरी

२

१ सेत मसणवटी दर सवाद का चेऊल

१ कोटा कालवड दर सवाद का श्रीगाव

१ गोपालपाडा दर सवाद मौजे पोइनाड

३ जदीद——

१ मौजे माहान ताो पाल

१ मौजे कुदे ताो उमटे

१ काा श्रीगांव ताो मजकूर

——
३

——
४

लाजिमा प्रांत मजकुरी—

बऱ्हाडटका व बोखार टका

लग्न टका लारी	बोखार टका
१	लारी १

——कलम १

दर गांवास——

दर घरास	दाहीजा को-
......साइफा	बडे सुमार
भारे सुमार १	१
लोणी चवथी	लग
१॥	०

——कलम १

विलायती ... ... गाव बदरे आहेत तेथे बाजे इलायतीहून फरोख्त करावयास जिनस येईल त्यापासून काइदा दर-मणी——

५ ताो खाडाले सेते

१ वीर्ती मला दर सवाद मौजे रुळे

१ वीर्ती उसरघर दर सवाद मौजे पवेले

२ मौजे कालवस

१ वीर्त दुबेटे

१ वीर्त खार खाचरी

——
२

१ वीर्त दारसेत दर सवाद मौजे तलवली

——
५

——
१०

खार सोनकोटा ताो परहूर

माां मारी गाव पाटेल याजकडेस काइदा

कन्यचे लग्नास	मुलाचे लग्नास
उलफा १	सेला १

——कलम १

विलायेतीमधें बंदरें

दर बंदरास——लारी ५

——कलम १

विलायेतीमध्यें वाणी व सिपी उदीम करावयास येतील त्यापासून सिपी व चाटे वाणी कापड विकतील त्या...... ल त्यापासून येतील ... ... दर नफरे पसोडी सनग १ ......स दर मणी

००।- कैली जिनस

००। वजनी जिनसास वजन

——
कलम १

००। वजनी जिनसास
वजन
००। कैली जिनसास कैली
५ सुमारी दर सदे
सुमार
—कलम १

प्रां मजकुरी हरकोण्ही दत घेईल व प्रायेस्चित घेईल त्यापासून सेला १

प्रां मजकूरपैकी आपल्या खारिया व वाडिया आहेत याजवर ज्याहाज फर्मावीस हाली पटी व पेस्तर पटी बिलकुल अजीपालणूक असे——कलम १

सण नि॥ बकाल का॥ चेऊल——

श्रावणी	सिमघा	दिपवाली
१	१	१

दर सणास जिनस

वजनी——	कैली
०॥· गूळ	०३ गहुं
०१ तूप	०१॥ डाल चणे
	०॥· डाल तुरी
०१॥·	

·।=॥·

प्रां मजकुरी तेलियाकडून दर सणास तेल ००॥· प्रा॥ सण ३ यों तेल वजन
००१॥·

प्रां मजकुरीं चाभाराकडून दर गांवास दरसाल १ पाईतण
१ पायपोस जोडा
२

वीर घाटावरून पण ? विकावयास येतील त्यापासून दर पणीस बोकड १

प्रां मजकुरी लम्मास

मेढ मूर्तास	वाण वोबसणपैकीं
१ नारल सुमार	१ मुंडा
५ विडे सुमार	१ परडी सर्व साहित्य सुधा

कलम १

नि॥ गौली तूप वजन दरसाल—०=

प्रां मारी सण तिवार दर सणास दर वाणिया कडोन जिनस--

००॥· कैली जिनस
००= गहूं
००= डाल चणे
००= डाल तुरी
००= डाल उडीद
००॥·

००१ वजनी---

००। गूळ
००। साखर
००। तूप
००। तेल ४८ अ
००१

कलम १

......

ले. २१ देवळे–चित्रें } श्री { श. १६१५ श्रीमुख पौष शुा १० इ. १६९३ डिसें. २६

श्री धर्म प्र
द्योतिताशेष व
र्णा दाशरथेरियं
राजारामस्य मुद्रे
यंविश्ववंद्या
विराजते

(सहा ओळींचा लंब वर्तुळी शिक्का)

स्वस्ति श्री राज्याभिषेक शेके २० श्रीमुख नाम सवत्छरे पौष्य शुध्यं दशमी भोमवासरे क्षत्रिये कुलावतंस **श्रीराजाराम छत्रपति** याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत सातारा यासि आज्ञा केली ऐसी जे **नरसो कायेदेव लाहनाजी कायेदेव वावरे** यानी **चंदीचे** मुकामी स्वामी संन्निध येऊन विनंती केली की कसबे **कुडालची** पाटीलकी व प्रांत मजकूरची नाडगोडकी ऐसी वतने आपली त्यास कसबाची पाटीलकीस इनाम पावणे दोन चावर सेत चालत होती त्यास हा देश राजश्री——कैलासवासी स्वामीस हस्तगत जाला ते[व्हा] इनाम नाडगौडकी वतनही ... ... अमानत जाहले कसबाचे पाटीलकीचे वतन चालत आहे तेणेप्रमाणे आपण अनभवीत आहो येसीयास स्वामी धर्मप्रभु प्रजापालक वतनदा[रा]चे छेत्र आहेत तरी आमचे पुरातन प्रांत मजकूरची नाडगौडकीचे वतन व कसबाचे पाटीलकीस पावणेदोन चावर इनाम ऐसी जीर्णोधार करून वृतीपत्र यावयासी आज्ञा केली पाहिजे म्हणून विनंती केली त्याजवरून मनास अणिता यास पूर्वी कसबा **कुडालाचे** पाटीलकीस पावणेदोन चावर इनाम व प्रांत मजकूरची नाडगौडकीचे वतन चालत होते त्या उपरि स्वामीस तो देश प्राप्त जाल्यानंतर इनामाचा व नाडगौडीचा भोगवटा तुटला आहे पाटीलकी चालते ऐसे स्वामीनी जागून नाडगौडकीचे वतन व इनामाचा जीर्णोधार करून नूतन दिल्हे असे बीतपसील

(श्री राजाराम नरपति हर्षनिदान मोरेश्वरसुत निळकंट मुख्य प्रधान)

(अष्टकोनी प्रतिनिधींची मुद्रा)

[चार ओळींची लंब वर्तुळी मुद्रा]

प्रांत कुडाल माहलाची नाडगौडकी अजरामऱ्हामत करून दिल्ही असे त्या वतनास हाकलाजीमा पूर्वी चालला असल तेणेप्रमाणे चालवणे

इनाम कसबाचे पाटीलकीस पांवणे दोन चावर भूमि जिरायेत कसबे कुडाल पा देविला असे जमीन चावर

१॥।

येणेप्रमाणे परगणीयाची नाडगौडकी व इनाम भूमी पावणे दोन चावर ऐसी दिल्ही असे तरी इनाम विसा पांडाच्या चिचियाने भूमी नाडगौडकीचे वतन ऐसे यास व याचें पुत्रपोत्रीदी वंसापरंपरेने चालवणे वर्षप्रतिवर्षी नूतन पत्राची अपेक्षा न करणे या पत्राच ... ... हून घेऊन मुख्य पत्र वाबरे ! मजकुरासी परतोन देणे जाणिजे

मर्या
देयंविरा
जते (अष्टकोनी शिक्का)

ले २२
चौल–अधिकारी

श्री

हु

श. १६१५–१६
इ. १६९३–९४

अज दीवाण रो खाने खास बजानेबु कारकुनानी हाल व हस्तकबाल माहाल हाये बिदानद सुा सन आर्बा तिसेन व अलफ निवारया व खारिया......खुमास......सकीन चेऊल मामले **मुर्तजाबाद** हुजूर येऊन बंदगी हजरत मालूम केले चेउ[ला] लाहून व पेटाहून मबलगा खुमास व हर जिनसी घाटावरी जातें व घाटावरून येते याचा हासील जकाती दखल होत नाहीं गुम हासील होतो मबलगा हासील उ...१...चा व चेऊल ह्या पेठांचा हासील जाया होतो सबब सदरहु माहाल.........या करितां आणनारास व नेणारास पुर्वत नाही याबदल कितेक लोक जलवाटेस **सुर्तेस** नेतात सुर्तेहून घाटावरी नेतात व कितयेक मुसुलमान सौदागर यासि जकाती माफ आहे याकरितां सौदागर... नावें करून कितेक जिनस नेताती व कितेक जकाती दान चोरी करून नेतात येणे– करून दिवाणची जकाती मबलगा जायां होते तरी सदरहु जिनसाची जकातीचा कानु करून आपणास बिडवीवगत मिरास औलाद अफलाद करून दिधलिया आपण मशाखत करून सदरहु जिनस घाटावरी नेतील व घाटावरून येतील ते दखल करून दिवाणची जकाती करून आपण आपले निसबतीनें रवाना करून गीर्दावारी करीन मबलगा हासील करीन तमाम कुलांची दिलासा करून हासील मामूर करीन तरी जकाती कानु आसान करू देणें सदरहु बाब माहालीं कारकुनास अर्ज केला तेही खातरेस आणून सदरहु जिनसाची जकाती सगीन कानु पेसजीची देखोन जकाती हासील जायां होतो म्ह......सदरहु जिनसाची बीडवगती मिरास करून देऊन व सदरहु जिनसांची कानु आसान करून व आपणास लाजिमा मोईन करून देऊन कौल दिधला आहे तो हुजुरून खातीरेस आणून कौल बसिके खास मरामत केलिया हासील मामूर होईल या कौल बीतपसील

किा १ कौल **सिदी अंबर** खु......स समत **तलकोकण** इसैन व अलफ छ १६ माहे रबिलवल बीाा

चेऊल देखील पेठा जकातीचे घेणे बीाा

ताफता कद १ सुाो लारी ·॥·	खारा कद १ सुाो लारी १०
सिती कदतल... सुाो लारी २	मुसजर कद १ सुाो लारी ·॥·
पाटाऊ १ सुाो लारी ·॥·	पीतांबर १ सुाो लारी १
चिनी तापता कद ·।·	सोखुलाद १ सुाो लारी १

जरबहु व मखमल व सखलात दर्याईयासी जे जिनसास जे कानु आसेल याची निमे जकाती घेणे रेसम पैसाळु व निकाळु वजन मण ०१ यासी जे माहाली बाबाजी असेल तेण्हे प्राो त्यास सोलवीस देऊन जकात घेणे

मा **अमीनाबाद उर्फ पाली**

जकाती घेणे बी तपसील——

ताफुता कद १ सुाो लारी ·॥·	खारा ! कद १ सुाो लारी १०	सिती कद १ सुाो लारी २
मुसोजर कद १ सुाो लारी ·॥·		
पाटाऊ १ सुाो लारी ·॥·	पीतांबर १ सुाो ·।·	चिनी ताफता १ सुाो ·।·
सोखुलाद १ सुाो लारी १		

जरबाब व मखमल व सकलाद दर्याई यासी चेउली १ या जिनसास जे कानु असेल त्याची निमे जकाती घेणे

रेसीम मण ०१ येक सुाो पैसाळु व निकाळु निमे होणे लारी २

किा १ कौल जकाती चौतरे नुबरे ! सन इसने इसरैन व अलफ छ २ माहे जमादिलौवल

तापता कद १ सुाो ·॥·	खारा ! कद १ सुाो लारी १
सिती कद १ सुाो लारी २	मुसेजर कद १ सुाो लारी ·॥·

पाटाऊ कद १ सुो
-॥-

चिनी तापता कद १ सुो
लारी ·॥·

पीतांबर १ सुो
·॥·

सोखुलाद १ सुो
लारी १

जरबाब व मखमल सकलाद व हरयेक जिनस कुमास दरसदे जे कानु लारी २ रेसीम वजन लस्करीचे प्रो लारी ८

शाहार **फतेनगर** येतील जकाती कानु १ या जिनसास व कुमास रेसीम यासी जे कानु शाहारां असेल तेण्हे प्रो घेणे—

किते २ खुर्दखते समत तलकोंकण

किता—१ किता—१

आपणास लाजीमा बदल मशाखत गुा रयेती उदमी लोकापासून रेसमास दर मणें लारी दीड १॥ व कुमासास दर कदे लारीची पाईण ·। येण्हेप्रमाणे मोईन करून दिधले आहे

येण्हेप्रों सदरहु माहाली जकाती होणें व चेउलास देखील पेठा व पालीवरों पाणसारे यासी दर सिरभारीस लारा निम व बैलास लारी येक येणेप्रमाणें घेणें या खेरीज बीडवी व बाजे लाजीमदार व हरयेक बाबे येक जरा तसवीस लागों न देणे व आपणासी बिडवीपणाची येखादे माहाली किताबत असेल ते माहाली किताबत मागतील तरी किताबतीची तसवीस न देणे ज्याजती तसवीस न देणे व आपणासी चोरून जो कोणी जिनस सदरहु नेईल त्यास ताकीद करणे व चेउली पटवे दलालीची निसबत लागो न देणे व बालाघाटीहून जे रेसीम आणोन दुकान वखारास ठेवितील पेस्तर खेत्रीयासी देतील त्यास दलाली होतो हालीची तसवीस न देणे येण्हेप्रो कौल व खुर्दखतें दिधलीं आहेत यावरून आपण मबलगा हासील केला यावरी **सिदी मुर्जान** हवालदार समत तलकोंकण हुजुरून माहालास पैवस्ता जाले येही हे कौल दूर करून आपणावरी **गोपाल नारायेण पिलाजी खत्री** हे उभे करून सदरहु जकातीचें लोकावरी चेउली बदल पेठा व पाली व १ ज्याजती चड कानु करून त्यांस बिडवपणा चेऊल पासी दोहां माहालीचे दऊन कौल सन सलास इसरैन व अलफ छ १४ माहे सवाल दिधला आहे बीतपसील

चउलीहून कुमास खरीद करून नेतील त्यास जकाती होणें

तापता कद १ सुो लारी २।·
चेऊल बागा पाली
पेठा लाहारी लाहारी
·॥· १॥
मुसेजर दर कदें लारी
१।॥·

सिती दर कदें लाहारी ५।·
चेऊल देखील पेठा
लारी पाली लारी
२ ३।·
खरा कद दर कदे लारी
२॥·

चेऊल बागा पालीस लारी
पेठा लारी ·॥· १।·
पाटाऊ किता १ सुो लारी १॥
चेऊल बागा पाली लारी १
पेठा लारी ·॥·
सोफ किमत द्र कदे पैसा बेणे ६
चेऊल देखील पाली लारी ३
पेटा लारी ३
पीतांबर १ सुो लारी ·॥·
चेऊल देखील पाली लारी ·॥·
पेठा लारी ·।·
कुतनी द्र कदे लारी ·॥॰
चेऊल देखील पाली लारी ·।॰
पेठा लारी ·।·

चेऊल बागा पाली लारी
पेठा लारी १ १॥
चिनी तापता द्र कदे लारी ·॥-
चेऊल देखील पाली लारी ·॥-
पेठा लारी ·।-
जरबाब व मखमल व सकलाद
किमत द्र कदें मोईन द्र सदें लारी ६
चेऊल बागा पाली लारी ३
पेठा लारी ३
पीतांबर खुर्द १ येक सुो लारी ·।॰
चेउली देखील पाली लारी.।-
पेठ लारी ०॰

रेसीम चेउलीहून बालाघाटींहून आणितील व बालाघाटींहून आणितील यासी बीतपसील
चेउली देखील पेठ येथील वजनास पालीस द्रमणें लारी २॥ घेणें
दाहीजा माफ करून सद्रहु कुलकानु घेणे

येण्हे प्रों कौल व पाणसारे यासी व नौद्र सिरभारीस लारी निम ·॥· व बैल-भारास लारी १ येक सद्रहु प्रों त्यासी कौल दिधलियावर हासील त्यांचे मुद्तप्रों हिसेबु पाहोनु तो माहाली माहाली हासील जमा जाहाला दिवाणचा हासील तुटला यावरी माहालींहून आपणासी फर्माविले जे सद्रहुप्रमाणें जकाती कानु कबूल करून बिडवीगतकरी यावरी आपण आइकिले जें माहालींचे कौलास कोणी हवालदार येतो तो पेसजीचे कौल मानीत नाही बेकौल करितात येण्हे कानून प्रजा लोक रंजीस होतात हासील तुटले अजीसबब आपण हुजूर येऊन सद्रहु हकीकत मालूम केली यावर हुजुरन तमाम अमल सद्रहु खातीरेस आणितां हरदो नफर गोपाल नारायेण व नारायेण पिलाजी येही माहालची खलेल करून हासील कम केला व प्रजा लोक रंजीस आहेत म्हणोन हुजुरून आपणास रजा फर्माविली जे प्रजा लोक तुवा राजी आहेत व सद्रहु अमलासी बिडगत तुवा कबूल करून हाली ज्याजती कानु चढ द्र दो ना केला आहे ते कानु कबूल करून प्रजाची दिलासा करून हासील मामूर करून बिडवीगत चालवी यावरी वजे हुकूम आपण प्रजाचा दिलासा करून रंजीसाई लोक मानितात व हासीलही मामूर नव्हेली याबद्ल बंद्गी अर्ज केला रजा फर्माविली जे हरदो नफरीं तुजवरी चढ ज्याजती केला तो हिसेब किती कैसा बैसतो यावर आपण बोलिलो जे

सदरहु माहालासी हिसेब पाहातां आपले कौलाहून सवाई कानु जमा होईल व माहाजन उदमी लोक व प्रजा फते नगरीची यासी हुजुरून खुसी केलें जिवारया व हर दो नाा यामधें कोणीच चिडीगतीस कबूल आहा यावरी माहाजन व उदमी लोक शाहार फतेनगरचे बोलिले जे जिवारयाचे चिडविगतीस राजी आहों चिडवीपण साहेबीं यासि देणें आगि हासील मामूर करून देऊन यावरी हुजुरून रजा फर्माविली जे ज्याजती चढ व कानु **गोपाल नारायेण** व **नारायेण पिलाजी** येही केली आहे ते कानूप्रमाणें बर हुकू[म] निर्ख गोपाल नारायेण व नारायेण पिलाजीच आपणाकडील करून हुजुरून माहालींहून मिन्हामतरोखा **माकत मलिक अंबर** सन सलास इसैन छ ९ माहे रबिलोवल व हुकुमती रोखा छ ४ सफर सन सलास कारणें आपला कतबा होऊन सादर केलें आहे तेने गोपाल नारायेण पिलाजी येही हासील बेरजि सदरहु माहालीं सवाई हासीलाची बेरीज होणें यावरी सदरहु माहालीं दौलतखाई हासील मबलगा सवाईहून बेरीज जबर जाली आपण मशाखती करून प्रजा लोकाचा दिलासा करून हासील मामूर केला आहे तो बाा हुकमत जमाखर्च सदरहु माहालीं हासीलज माफक आहे यावरी हालीं साल मजकुराकराणें सिदी मुर्जान येनुला ? यांही जकातीचौत्रे उबें व मालसेज येथील हवाला हुजुरून फर्माविला ते माहालीं पैवस्ता जाली यावरी आपणासी बर अकस करून शाहार **फतेनगरीहून** रेसीम बंदर चेउलास पाठविलें होतें व चेउलीहून ताफते व सारे ? व सिती व बाजे खुमास शाहार **फतेनगरास** आणीत होतों ते रोज दाहापंधरा खोलंचून लाइनी व सूर करून सालगुाा हासील ज्या जिनसास घेतला त्याहून साल मजकुरी आपले कारकीर्दी हुजुरून हुकुशा खुमास खोलंचून खुमास सवाईप्रमाणें हासील घेतला येणेकरून कौल पालत नाही म्हणोन माहाजन तमाम

[अपूर्ण]

ले. २३
पोलादपूर-चित्रे

श्री

शा. १६१६ माग शुाा ९
इ. १६९४ डिसें. १५

राजश्री बाहिरोजी त्रिमले नामजाद व कारकून सरसुभा प्रांत **चेऊल** गोसी

ई अखडित लक्ष्मी अलकृत राजमान्य——श्राो **शंकराजी नारायेण** नमस्कार सुाा खमस तिसैन अलफ **सभाजी हैबतराव देशमुख** ताा **अश्रेधारणे** हे राज्यता कष्ट मेहनत ऐकनिष्टपणे करीत अले किले **सुधागड** गनीमापासून हस्तगत केला ते समई थाणा धारे मालेस लागुन किला फते करून स्वामिकार्यसिधी केली त्याजवरून मेहरबान होऊन हे मर्दाने साहेबकामाचे अैसे जागून इनाम मौजे **कान्हवली** ताा मजकूर हा गाव मारनिल्हेस खुद जातीस दिल्हा तसे तरी कुलबाब कुलकानु खेरीज

हाकदार व इनामदार वजा करून मौजे मारचा आकार होईल तो इनामखर्च लिहीत जाणे या पत्राची प्रतीं लेहून असल पत्र भोगवटीयास परतोन देणे प्रतिवर्शी नूतन पत्राची आक्षेप न करणे जाणिजे छ ७ माहे जमादिलौवल.

ले. २४
चरंध–देशमूख

श्री

श. १६१७ कार्तिक शुा ७
इ. १६९५ नोव्हें. ३

नकल

स्वस्ति श्री राज्याभिशेक शेके २२ युवा नाम सवत्सरे कार्तिक सुध सप्तमी रविवासरे क्षत्रिये कुलावतंस **श्री राजाराम छत्रपति** याणी **संभाजी नरसोजी गायेकवाड** देशमुखी तपे **वीरवाडी**———वाडी यासी आज्ञा केली ऐसी जे तुझा बाप नरसोजी गायेक(वा)ड स्वामी **रायेगडी** असता **इतकातखान** गनीम येऊन किलियास बिलगला ते समई गनिमास जाऊन भेटला आणि हावपालत गनिमास सागितली त्यावरून तपे मजकुरीची देशमुखी अमानत करून माा **रुभाजीराव येरुणकर** यास दि(ल)ही होती त्यावरून राजश्री **खंडो अंबाजी** सभासद हुजूर स्वामीचे सेवेसी **चजीचे** मुकामी येऊन विनती केली जे स्वामीच्या पायाजवल सेवकाने येकानिष्टपणे सेवा केली आहे आणि पुढेही निष्टपूर्वक स्वामिसेवा करावयाची उमेद धरीत आहे याकरिता स्वामीने सेवकावरी मेहरबान होऊन नरसोजी गायेकवाड देशमुख याचा गुन्हा माफ करून त्याची त्यास देशमुखी करार करून देविली पाहिजे म्हणून तपासलि विनती केली त्यावरून मनास आणिता **खंडो आंबाजी** स्वामीचा सेवक येकनिष्ट स्वामीच्या पायावितरिक्त दुसरे दैवत जाणीत नाही याकरिता माानिलेचे सेवेवरी स्वामींस तोसी होऊन तुझा बाप नरसोजी गायेकवाड याचा गुन्हा माफ करावयाचा नव्हे म्हणून तुझे माथा गुन्हेगार होन पातशाही ५०० पाचसे ठेवून सदरहूचा वसूल राा खंडो अंबाजी याजपासून घेऊन देशमुखी याचे दुमाला केली असे तरी सदरहु पाचसे होन याजपासून घेतले त्याचा वसूल तू माारनिलेस देऊन पावलियाचे जाब माारनिलेचा घेणे आणि देशमुखी तुझी तुज करार केली अहे ते अनभऊन स्वामीसेवा निष्टपूर्वक करणे पाचसे होन माारनिलेजवळून हुजूर घेतल आहेत ते मारानिलेस न दिल्हेस म्हणजे देशमुखी तपे मजकुरीची मारनिलेस स्वामीने दिल्ही आहे तुज देशमुखीसी समध नाहीं———————————————

[तात्यासाहेब देशमुख; शिक्केकरी, वरंध यांचे संग्रहांतील.]

लें. २५
प्रतापगड-हडप

श्री

शं. १६१९ पौष शुा १०
इ. १६९७ डिसें. १३

भवानी

मा अनाम हवालदार व कारकुनानी मुा किले **प्रतापगड** यांसी **रामचंद्र नीलकंट** अमात्य सुा समान तिसैन अलफ मौजे **कावडी** श्रीस इनाम दिली आहे त्यास मौजे मजकूरची पाटीलकी **बहिरोजी माणकुबरा** जुमादार दिा **सकराजी गोले** हा स्वारी याची पाटीलगी थैसीयास सेतभात मौजे मजकुरी करितो त्यास तुम्ही नफर मजकुराची सनद मजुरा देत नाही म्हणून कलो अले वसूल मागता थैसीयास चाकरमाने लोकास तुम्ही कैसे वसुलाचा तगादा करिता याउपरि नफर मजकुराच्या सेताचा जो आकार होईल तो तकुब ठेवणे पेस्तर माहलास सनद सादर होईल तेणेप्रा माहाली खर्च पडेल तुम्ही वसुलाचा तगादा येकदर न लावणे छ ८ जमादिलाखर पा हुजूर राजते

लेखना (उभी कोयरी तीन ओळी)
वधिः

+सुरु सुद +बार
+पैवस्तगी छ १५ रजबु +अक्षर भिन्न,

ले. २६
प्रतापगड-हडप

श्री

शं. १६२० अधि. ज्येष्ठ वा ६
इ. १६९८ मे २१

मशरुल अनाम **येसाजी पानसरे** हवालदार व कारकून दिमती श्री—मुकाम **प्रतापगड** यासी **रामचंद्र नीलकंठ** अमात्य आसीर्वाद व नमस्कार सुहुर सन समान तिसैन अलफ श्रीकडील सबनिसी वतन पुरातन आमची आहे याकरिता सबनिसीच्या कार्याबदल **बालाजी बिस्वनाथ** पेसजी उमेदवार होता कामाचा मर्दाना देखो सबनिसीची मुतालिकी देऊन पाठविला आहे याच्या हाते सबनिसीचे कार्य घेणे यासी तैनाती दर माहे होनु ॥ ५ येकूण पांच होनु पा रास केले असे इा पा पासून वजावाटाऊ दंडकप्रमाणे वजा करून उरले वतन माहे दरमाहे पाववीत जावे यासी जमान तुम्ही घेणे छ २० जिलकाद

(मुद्रा: ˘ ० श्रीरामचं द्र चरण नील कंठ सोनदे व शरण — पांच ओळींची लंबवर्तुळी मुद्रा)

[नि. अ.] निदेस समक्ष लेखन

सीमा समु (लंबवर्तुळी तीन ओळींची मुद्रा)
बार हुसती
पैवस्तगी छ २३ जिलकाद सन तिसा

ले. २७
प्रतापगड–हडप

श्री
ताा

{ श. १६२० अश्विन वाा ९
{ इ. १६९८ ऑक्टो. १७

स्वस्ति राज्याभिशेक शके २५ बहुधान्ये सवंछरे आस्विन बहुल नवमी इदुवासरे क्षेत्रिय कुत्लावतंस श्री राजा छेत्रपति याणी राजेश्री **आणाजी जनार्दन** देशाधिकारी प्राा वाई यांस आज्ञा केली यैसे जे **शाहाजी खीरसागर** हा राजेश्री **शकराजी पंत सचिव** याचे हुजरातीस होता तो **हम······दीखान** गनीम वंदनगडाखाले आला ते समई युध जाले युधी स्वामीकार्यावरी चीज जाला त्याचा पुत्र **नरसोजी खीरसागर** आहे त्याचे चालवणे हे स्वामीस अगत्य म्हणून यासी नानपरवेसी चालवावी अैसा निस्चेये करून यास मौजे **धामणेर** संमत **कोरेगाऊ** येथे सेत बिघे ·।१० चालीस बिघे केले आहेत ते याचे नावे देविले असे तरी तुम्ही सदरहु सेताचे आकार करून याचे नावे नानपरवेसीचा खर्च लिहिणे मजुरा होईल जाणिजे

ले. २८
पोलादपूर–चित्रे

श्री

{ श. १६२० आश्विन वाा १४
{ इ. १६९८ ऑक्टो. २२

स्वस्ति श्री राज्याभिशेक शके २५ बहुधान्य नाम संवत्सरे आश्विन वद्य १४ मंदवासर क्षत्रिय कुलावतंस राजश्री **राजाराम छत्रपति** याणी राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान मावी सुभा प्रांत **मावल** यांसी आज्ञा केली अैसी जे राजश्री—— **हम प्रभु** येही स्वामीस **साताऱ्याचे** मुकामी विनंति केली की **संभाजी बिन बाजी प्रभु** हे राजश्री कैलासवासी स्वामींचे वेळेस **नासीकचे** जुझी जखमा लागोन चकचूर जाले आहेत त्याच्याने शेवा होत नाही योगक्षेम चालिला पाहिजे म्हणौन राजश्री संकराजी पंडित सचिव इही मौजे **गुगुलवडे** ताा **अतोणे** प्रांत मजकूर हा गांव इनाम दिल्हा आहे त्यास स्वामींची सनद असीली पाहिजे याकरितां सनद देऊन उतरोतर चाले असी आज्ञा करविली पाहिजे म्हणौन विस्तारे विदित केले त्याजवरून मनास आणितां **संभाजी बाजी** हे स्वामिकार्यांवर चकचूर जाले आहेत याचे चालवणे हे स्वामीस अगत्य म्हणौन यावर रुपाळु होऊन माारनिल्हा मौजे गुगुलवडे ताा आतोणे प्रांत मजकूर हा गाव कुल बाब कुलकानु खराज हाकदार व इनामदार करून हाली पटी व पेस्तरपटी सहित दिल्हा आहेती याप्राा स्वामीने चालवावयाची आज्ञा केली असे तरी सदरहु गाव इनाम उतरोतर यास व याचे पुत्रपौत्रादि वौसपरंपरेस चालवीत जाणे सालदरसाल ताजा सनदेचा उजूर करीत नव जाणे या पत्राची प्रती लेहोन घेऊन मुख्य पत्र परतून भोगवटीयास मारानिले जवल देणे जाणिजे निदेश समक्ष (गोल शिक्का)

रुजु सुरनिविस

तारीख २७ रबिलाखर सुाा
तिसा तिसैन अलफ

ले. २९
चौल–अधिकारी

{ श. १६२० पौष वा १४
{ इ. १६९९ जाने. १९

(फार्सी शिक्का अट्ठावन्न ओळी फार्शी मजकूर)

अज दीवाण व फौजदार व अमीन सरकार **तलकोकण** निजामन मुल्की भिन्नमजाफ सुबे खुजिस्तें बुनियाद बजानेब आमिलांन व कारकुनान हाल व हस्तकबाल व देशमुखान व देशपांडियांन्न व ज्यमीअ ज्यमीदारांन मामले **मुर्तजाबाद** उर्फ **चेऊल** बिदानद कें चु सुा तिसैन अलफ दरीविला **आपाजी माहादाजी** आधिकारी मामले मजकूर हुजूर येऊन बंदगी मलाजमतेस अर्ज केला ऐसा जे आपले बडे साष्टीकर बनाम आधिकारी सुबें **वसई** अमल हुन कार सुलतान बाहादुर **गुजराथ** होते ते तर्फ देशमुखीचा अमल त्या तर्फेचा चालवीत असता त्यास आपले बडे **अर्जुन ठाकूर** यांचे फर्जंद बनामउ सात तपसील जैले

बाब ठाकूर	नार ठाकूर	राम ठाकूर	बाल ठाकूर
१	१	१	१
सोन ठाकूर	हीर ठाकूर	गण ठाकूर	लग

सदरहु सात फर्जंद अदकारी पादशाही कामावर हक्क जाहाले ऐसीयास सदरहु-जणांचीं सिरें बंदर केलवें माहीम तालुके मजकूर हुकूम फर्माऊन सिरें येक मंजील गलबत बिन परवान सुकान वलीं नसतां समेत दर्यामधे सोडिले जे बंदरी लागेल त्या बंदर प्रगणेयाची खिदमत अदकारीपणाचें वतन मरामत करावें ऐसा करार दाद फर्माऊन गलबत दर्यामध्यें सोडिलें तें गलबत——खुदारजानें खाडीनजीक टेब हाली लावणें नउदर बागमला दर सवाद जमीन मवाजे वानेले तपे बाह्मणगांव बंदर प्रो मजकूर हे जागां व ते बंदरी मंजल मजकूर सिरांदेखील येऊन लागलें त्यास हे खबर साष्टी मजकूर **रूपाई अयाल अर्जुन ठाकूर** होती तीस खबर जाहीर जाहाली यावर अयाल मजकूर हुजूर जाऊन मलाजमतेस अर्ज पोहचविला सिरांदेखील मंजील मजकूर बंदर प्रो **मुर्तजाबाद** उर्फ **चेऊल** हे जागां पैवस्ता जाहालें हुकूम फर्माविला कीं बंदर प्रो मजकूरचें अदकारपण वतन मुकरर बाब करून रूपाई मजकूर इचे कानीकाप अज रूपाई मेहरबांनी बरामत फर्माऊन दिल्हे त्याची बाब कापरुपाई लाजिमा व इसाफत मौजे वानेलें सिरें दफनाविली सबब इसाफत मन्हमत केली सदरहु वतन मरामतीचें फरमान बनाम **गोद ठाकूर** वलद **बाब ठाकूर** नातु रूपाई याचे नांवें करून रूपाई मजकूर बंदर प्रो मजकूर पोहचली खिजमत अदकार वतन ज्यारी करून अवकात चालऊन——यास द्वायाद असोन आपलें वतनाची खिदमत करीत असतां त्यास देशीं परदेशीं भोगवटा चालत आला ऐसीयास अमल निजामन्न मुलुक ते वख्तीं **अर्जुन ठाकूर वलद गोज ठाकूर** याचा फर्जंद **बाब ठाकूर** याचा फर्जंद **संवद ठाकूर**

याचा फर्जंद **सुडक ठाकूर** याचे फर्जंद **भाव ठाकूर** व **कृष्ण ठाकूर** सदरहु देशीं परदेशीं भोगवटा अमल मजकूरीं होत आला निजामन्नमुल्लकीं वतनाचें फर्मान बमोजीब पेशजी हासील केलें अैसीयास इसाफत मौजे **वानेलें** तां **बाम्हणगांव** प्रां मार मुतलख **वैराण** व बेआबाद जमीन काबील नाहीं सबब——हुजूर अर्ज करून मौजे मजकूरचा मुबादला **ढऊर** तों **खाडाले** इसाफत मागोन सनद हासील केली बाआदज दर अमल अजीदखानीं भाव ठाकूर व कृष्ण ठाकूर वलद सुडक ठाकूर अदकारी येही तेच मोजीब मजकूरचे फर्मान वतनाचे भोगवटेयाचे हासील करून भोगवटा चालिला बाआदज अवली दवलत कावीरां अर्जानी होऊन महदारुल माहामि हाजी शफीखान देवाण दखण सुबे औरंगाबाज साहेबाचे सनदेमोजबि इनायेत पेशनि हासील केली त्यामोजीब **धर्मांगददास** देवाण व **करीमबेग** देवाण वगैरा देवाण निजामन्नमुल्लकीं हासील केली अैसीयास दरम्यानें नादीकार **सिवाजी राजे** मवासपणें फितवा व फसात बरपा करून मुलुक वैराण केला सबब तमाम रयेत लोक **रेवदंडे**यामधें सुखवस्ती करून राहिले ते वख्ती आपल्या सनदा व फर्मान वतनाचें व बाजे कागद व खतें मिलकतीचीं शरीफ अली वलद **मिर्जा महमद** रजा याचे हवेलीमधे संदुक कागदाची ठेविली होती अैसीयास दरसाल सन समान तिसैन अलफ तेरीख १५ रोज माहे जिलकाद ते रोजी येक ब येक गजब होऊन **शरीफ अली** याचे हवेलीस दोन प्रहर दिवसास आग लागोंन सोख्त जाहालें ते बख्ती आपण दर खिजमत देवाणसाहेब मुशरफ होतो खबर अैकतांच आपले कागदाचे संदुकेचे खबरेस गेलो तंव तमाम हवेली सोख्त होऊन गेली त्याबराबर आपले कागदांची संदुख सोख्त जाली हे खबर तेच रोजीं दर खजमत देवाण साहेबकी बले जाहीर केली अैसीयास आपण वतंदार जे कोण्ही देवाण व हाकीम यांची शरीफ अर्जानी होते ते पेशअजीच्या सनदा वतनाच्या खातीरेस आणितात त्यामोजीब आपणही मेहेरबानी अर्जानी फर्माऊन चालवितात अैसीयास आपलें सनदाचे हकीकत सदरहुप्रमाणें कजियां होऊन गेला हा तमाम अवकास जाहीर असे त्यास साहेब मेहरबान होऊन ताजी सनद अैनायेत करावयास हुकूम फर्मावणार साहेब धनी आहेत म्हणोन इलतिमास खातीरेस आणून प्रां मजकूरचे जमीदार देशाई व देशकुलकार्णि यांचे कानुजाबिते व नकला भोगवटे मनास आणून व तुमचा भाई **गोविंदजी** अदकारी कसबे **झिराड** येथे होता त्या नजीक आलमपन्हा——अलि अदलशा बादशां याची सनद फर्मान व जुजबी कागद राहिले होते तेही हुजूर आणोन रुजु केले त्यावरून अदकारपणाचे वतन मौरुशी कदीम अयांम पासोन पिढी दर पिढी पुस्तदरपुस्त भोगवटा चालत आहे व हुजूर बादशाही खिजमतीमधे मशूर असेत त्यास पेशअजी पासोन इनामती व इशाफती व कापुरपाईक व कानु काइदा व हक लाजिमा चालत आल्यामोजीब चालूं दीजे वतनांची खिजमत

घेऊन हक लाजीमा देत जाणें नकल घेऊन असल भोगवटेयास फिराऊन देणे रा छ २७ रजेब मोर्तब (गोल शिक्का)

[एकूण कागद सहा जोडावर मागें मोर्तबाचे ठसे.]

ले. ३०
प्रतापगड-हडप

श्री

शा. १६२० च माघ वा २
इ. १६९९ फेब्रु. ६

दं मशहुरल अनाम **येसाजी पानसरे** हवालदार दिा श्री मुा **प्रतापगड** यासि **रामचंद्र नीलकंठ** आसीर्वाद सुहुर सन तिसा तिसैन व आलफ वेदमुर्ती **विश्वनाथभट हडप** श्रीचे पूजेस आहे त्यास मुलीच्या लग्नाकरितां श्रीचे डबापैकी रुपये १२८ बारा व उतारी म्यानबेंदी १ थैंक देविली आहे येणेप्रमाणे देऊन भट गोसावी यांकडे खर्च लिहिणें जाणिजे छ १५ शाबान [नि. अ.] जाणिजे निदेस समक्ष लेखन सीमा समु ल्लसती

॰ ० श्रीरामचं द्र चरण नील कंठ सोनदे व शरण (पांच ओळींची वाटोळी मुद्रा)

(तीन ओळींची वाटोळी मुद्रा)

पैवस्तगी छ २० साबान

[याच दिवशीं याच मजकुराचें पत्र रामचंद्र पंतांनीं वेदमूर्ती विश्वनाथ बटांस लिहिलें आहे. तें छापावयाचें रद्द केलें.]

ले. ३१
प्रतापगड-हडप

श्री

शा.१६२१ आषाढ शुा १
इ. स. १६९९ जून १८

श्री भवानी

रोजकीर्द

मुा प्रतापगड माहे मोहरम छ १० रोज

सुा मया

......जमा सुदगी वेदमुहूर्ती राजेश्री **नीलकंठभट बिन विश्वनाथभट** पूजक श्री——यावर माहाराज राजश्री——छत्रपति स्वामी कृपाळु होऊन जाजती सरजामी केली माहाराज राजेश्री छत्रपति स्वाम श्रीच्या दर्शनास आले ते समई राजेश्री **विश्वनाथभटी** विनती केली की आपणांस राजेश्री——कैलासवासी स्वामीनी सेभर होन प्रतिवर्षासन केलें होते ते आजीवार चालत आले यांउपर आपले वार्धक्य जाले आहे आपणास श्रीची सेवा सांग होत नाही तरी आपले पुत्र नीलकठभट पदरचे भले योग्य आहेत त्यास आभिशेक करावयाची आज्ञा केली पाहिजे म्हणजे त्यावरून तुम्हांवर

स्वामी संतोसी होऊन श्रीस अभीसेक करावयाची आज्ञा केली आहे वा सनद माहाराज राजेश्री छत्रपति स्वाम छ २९ जिल्हेज पैवस्तगी छ मार वर्षासन सालिना होन पा
२००

१०० तुमच्या बापास होते ते
१०० हाली तुम्हास जाजती केले
२००

......जमा सुदगी आसामी १

ले. ३२
प्रतापगड-हडप

श्री

शा. १६२२ चैत्र वा १२
इ. १७०० एप्रिल ५

राजश्री **येसाजी पाणसरे** हवालदार व कारकून दि॥ श्री——मु॥ किले **प्रतापगड** गोसावी यासि

॥ र्द अखडित लक्षुमी अलकृत राजमान्ये——स्नेहांकित **विठल गोपाल** नामजाद व कारकून सुभा **जाउली** असीरवाद व नमस्कार सु॥ मया अलफ हुजरून राजश्री——पंतप्रधान याचे आज्ञापत्र **विशालगडीहून** सादर जाले बराबरी वेदमूर्ता रा॥ **जनार्दनभट** मुतालिक दि॥ उपाध्ये छ १५ सौवल पौ छ २३ मि॥ सादर जाले तेथे आज्ञा की श्री मु॥ किले प्रतापगडचे अभीशक पूजा करावयानिमित्य राजश्री——छेत्रपति स्वामींनी वेदमूर्ति रा॥ भट गोसावी पाठविले अहेती तरी येणेप्रमाणे देणे म्हणौन आज्ञापत्र सादर जाले बीता॥

अभीशकी ब्राम्हण युगम व सवास्णी	दक्षना व पातले
१० ब्राम्हण	पातले ५ चोलिया ५
५ युगमे	दक्षणा लारी
५ सवास्णी	१५ ब्राम्हण व युगमें
५ किरकोल	५ सवास्णी
२५	२०
यासि सामोग्री मोईनप्रमाणे देखील श्रीचा नवैद्य सामोग्री देणे	उपसामोग्री पूजेची भट गोसावी सागतील त्याप्रमाणे देणे

येणेप्रमाणे अज्ञापत्र सादर जाले त्यावरून येणेप्रमाणे पाटविले असे

रुपये १० ता॥	नख्त द लणावली गहू ०।१ यो ०॥
२ दक्षणा देव	कैली साडे दसेरी
५ युगमे	०।१ तादुल सडिक

१ बाा चोलिया सवास्णी	८।१ गहु
२ दक्षणा	८८१ मिरची
५ ब्राम्हण १०	८८१ दाली तुरी
	८॥।·।·
२ क्रिरकोल	वजन वाा
भूरी (भूयसी)	८८ तादुल
७	८८८ गहु
	…………
………	…………
………नारेले	८८८९ ……
२	८८॥ साखर राा
(विठल	८८॥ खारीख
गोपाळची	८८१ सुपारी
मुद्रा) (तीन ओळींची	८८॥ खोबरे
अष्टकोनी मुद्रा)	८८२ चिच
	८८। मिरे
	८८८९ जिरे
	८८८१ हिंग
	८८॥ हळदी
	८८८९ कुकु
	८८॥ मद
	८। ………

येकूण रुपये दहा व रुके चोवीस व कैली साडे दसेरी मापे सवानव पाइली वजन वार पावणे तेरा सेर साडे सात टाक सुमार दोनी येणेप्रमाणे पाठविले असे तरी वेदमूर्ती भट गोसावी याचे विदमाने खर्च करणे अणी सदरहु प्रमाणे श्रीकडे जमा धरून जाब पाठवणे छ २५ सौवाल हे विनती मोर्तब

सुध (अष्टकोनी शिक्का)

[कागदास दोन जोड त्यांवर मोर्तबाचे ठसे.]

ले. ३३
प्रतापगड—हडप

श्री

शं. १६२२ आश्विन शु. ३
इ. १७०० आक्टो. २

वजा जमा खा गुा **नूरभाई** आतारीण मुा **विशालगड** दिा सरबतखाना हुजरात दिमती श्री मुा **प्रतापगड** सुा इहिदे मया व आलफ हुजूरून थैवज श्रीच्या नवरात्रच्या मोहछाये बा दिल्हा त्यांपैकीं खुशबाई जिनस हुजुरून खा करविला गुा कारकून सरबतखाना छ २९ रबिलाखर पैवस्तगी जमा बा रोजकीर्दी छ ४ जमादिलौवल तकदमा खा बा दाभोली लारी ५० येकूण बेरीज

श्री राजा राम शक्तीवर दायक सेवेसी तत्पर...
......
(पांच ओळी आटकोनी)

वजनी तोलेवार
०००१॥·
मो दीड तोला वजनी
तोलेवार रास
वजनी तोलेवार जिनस किा रुपये
४ कस्तुरी ०००॥· किा
१ चोक ! किा ०००१ किा
५ — ०००१॥
तेरीज रुपये
५
१०॥
१५॥

वजनी टाां
०·।· ॥ १३॥·
मो पावणे अकरा सेर साडे तेरा
टाक वजनी ट टकबंदी रास
वजनी टा जिनस येकूण किा रुपये
५ मोगरेल ००२
·॥· कुकु ००२
२। अबीर ००४
·।· गुलाल ००१
·।· ऊद ०००१३॥
१ उदबत्त्या ००॥·
१ आरगजा ००।·
·।· रक्तचंदन ००१
१०॥· ०·।·॥१३॥·

येकूण रुपये १५॥ दर रुपयासि दाभोली लारी ३।. येकूण लारी ५०।= पैकी···
···सुद दाभोली कारदनास (लारी पनास) ५००.

······जमा——थैन जिनस

वजनी तोलवार
०००१॥·
०००॥· कस्तुरी
०००१ चोव !
०००१॥·
तेरीख ४ जमादिलौवल

वजनी टाां
०।·॥१३॥·
[सर्व यादी वर दिलेल्या वजनांत वरील प्रमाणें.]

माहे जमादिलौवल

ले. ३४ पोलादपूर-चित्रे } श्री { श. १६२४ आषाढ शुा ११ इ. १७०२ जून २४

स्वस्ति श्री राज्याभिषक शके २९ चित्रभानु सवछरे अशाढ शुा येकादसी भानुवासरे क्षेत्रिय कुलावतंस श्री———श्री छत्रपति

सिका सिका

व कारकून वर्तमान व भावी प्रांत चेऊल यांसि आज्ञा केली ऐसी जे **मालजी बिन अतोजी जाधव** सरनाईक किले **सुधागड** याणी हुजूर विनंति केली की आपण स्वामीचे राज्यात कष्ट मेहनत केली व किले मारी मुलख हस्तगत जाहाला होता ते प्रसगी आपण श्रम साहास करून स्थल हस्तगत केले परतु आपले मर्जीत जाहाले नाही याजकरिता राजश्री **बहिरोपंत प्रधान** याणी आपणास मौजे **धोंडसे** ताा **अतोण** हा गाव इनाम करून दिल्हा आहे तरी साहेबी मनास आणून आपले लेकराचे लेकरी चाले ऐसे इनाम करून दिल्हे पाहिजे म्हणून त्याजवरून मनास आणिता **मालजी नाईक जाधव** याणी किले मार हास्तगत केला ते समई कष्ट बहुत केली साप्रतही करीत आहेत याकरिता यास ———इनाम करून दिल्हा आहे तो दूर करून नूतन इनाम मौजे मारपैकी जमीन राजभाग गला माहाल मापे खंडी च्यारी मापें मौजे माा यास सेतकी पडीची जमीन कीर्द करीचे ठिकाण चालप ! आहे त्यातील त्यापो गला खडी २॥ पौ गला माहाल मापे खडी २॥ ऐकूण माहाल मापे खडी ५ पाच रास इनाम करून दिल्हे आहे यास कीर्द पौ अडीच वाच खडी पौ कीर्द करीतील त्यापौ अडीच खडी खडीं नूतन देऊन इनाम सेताचे ठिकाणास खेरीज हाकदार करून इनाम याचे पुत्रपौत्रादि वौशपरपरेने चालवणे साल दरसाल ताजा सनदेचा उजूर करिता नव जाणे या सनदेची तालिक लेहून घेऊन असल पत्र भागवटीयास परतोन देणे निदेश समक्ष मोर्तब

बार रुजु सुद बार

[जंत्रीप्रमाणें बुधवार आहे. बुधवार धरून तारीख दिली.

ले. ३५ पोलादपूर-चित्रें } श्री { श. १६३० चैत्र वाा ८ इ. १७०८ एप्रिल २

(सिका)

अज दीवाण राऊश्री **विसाजी भास्कर** हवालदार व कारकून सी माहाल मामले **पाली** तां खोत मौजे **धोडसे** तो **आताणे** सुा समान मया व आलफ इनाम श्री भाराई किले **सुधागड** यास सनद राजश्री **संकराजी बाजी** सुभेदार छ २१ मोहोरम पौ छ मजकूर तेथे आज्ञा जे मौजे मजकुरी **बाधण** देवविले रकम मुढा १ येक इनाम भूमी पुरातन होती ते चालत नव्हती ते मांा **मालजी नाईक जाधव** सरनाईक किले

सुधागड याणी विनंति केली त्याजवरून श्रीचे... ... ती भूमी रकमी मुढा १ येक आहे ते श्रीकडे चालवणे तेथील उत्पन्न होईल ते श्रीकडे पाववीत जाणें प्रति वरषी नूतन पत्राचा उजूर न करणे जाणिजे छ २१ मोहोरम सन समान मोर्तब सुद (सिका).

ले. ३६
पोलादपूर–चित्रे

श्री

श. १६३० वैशाख वा १०
इ. १७०८ मे ४
तालिक
राजाराम

स्वस्ति श्री राज्याभिषेक शेके ३४ सर्वधारी नाम सवत्सरे वैशाख बहुल दशमी भोमवासर क्षत्रिय कुलावतंस श्री राजा **शाहु छत्रपति** स्वामी याणि राजश्री देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रात **जाउली** यांसि आज्ञा केली [यैसी जे]

० श्री ~
शिववरपति ह
र्पनीधान मोरेश्वर
सुत भैरव मुख्य
+ प्रधान +

पिलाजी बिन भोजजी गोले याणे मौजे **पाटगाऊ ता कुडाल** येथील मुकामी हुजूर स्वामीसनिध येऊन विनंति केला की आपण पूर्वापार स्वामीच्या राज्यातील सेवक येक निष्टपणें सेवा करीत आलो सांप्रत स्वामी स्वामी राज्यात आले आपण जमावानसी स्वामसिंनिध येऊन येकनिष्टपणे सेवा करीत आलो यैसीयासी पूर्वी राजश्री—— कैलासवासी स्वामी **चंदीचे** मुकामी असता आपणास कितेक कार्यप्रयोजेनाविसी पत्रे पाठविली त्याचे आज्ञेवरून राजश्री **रामचंद्र पंडित आमात्य** या प्रांते होते त्याजवली बहुत प्रकारे येकनिष्टपणें सेवा करून कितेक स्वामीकार्ये करून दिल्ही त्यावरून आपणास बक्षीस नेमिले होते परंतु ते आपण मान्य केले नाही मग मेहरवान होऊन नूतन वतन देशमुखी ता **कोढवी** व ता **विन्हेरे** सुभा प्रांत मजकूर या दोही माहालीची करून देऊन पत्रे दिल्ही आहेत परंतु धामधुमेच्या प्रसंगाकरिता भोगवटा चालिला नाही हाली स्वामी रुपाळु होऊन सदरहु दोही माहालीचे देशमुखीचे वतन आपणास आजरामरहामत करून देऊन वंशपरंपरेने चाले अैसे दिल्हे पाहिजे म्हणून विनंति केली त्यावरून मनास आणिता **पिलाजी भोजजी गोले** हे पुरातन राज्यातील सेवक पूर्वीपासून येकनिष्टपणे सेवा करीत आले साप्रत स्वामी स्वराज्यात आले ते प्रसगी किले साताराचे मुकामी जमावानसी स्वामीसंनिध येऊन त्या प्रांतीची देशदुर्गे स्वामीस आनकूल करून दिली व समागमे जमावानसी राहोन येकनिष्टपणे सेवा करून स्वामीस संतोषाते पाविलें त्यावरून स्वामी याजवरी रुपाळु होऊन यांसि नूतन वतन देशमुखी ता कोढवी व ता विन्हेरे प्रांत मजकूर या दोही माहालीची आजरा मरहामत करून दिल्ही आहे सदरहु दोही माहालीचे देशमुखीचे वतनास गाव ता कोढवी गाव ४० ता विन्हेरे १६ येकूण दोही

तर्फचे छेपन गावीचे देशमुखीचे वतन याचे दुमाला करणे या वतनास हक्क लाजीमा गैरमहसूल पैदस्त सेवधार बाजार पसकी उकामबाजे उत्पन्न देशमुखीच्या वतनास सुदामत चालिले आसेल त्यरप्रमाणे चालवणे व इनामती गावगना व इसापती व इनामगाव सदरहु देशमुखीच्या वतनास सुदामती चालिले आसेल त्याप्रो याचे दुमाला करून याचे हाते देसमुखीचे वतनाची सेवा घेत जाणे सदरहु दोही माहालीचे देशपुखीचे वतन यास व यात्रे पुत्रपौत्रादि वंशपरंपरेने चालवीत जाणे प्रतिवर्षी नवीन पत्राचा आक्षेप न करणे तालिक लेहून घेऊन मुख्य पत्र भोगवटीयाबदल परतोन देणे निदेश-समक्ष मोर्तब असे

तेरीख २३

सफर सु । समान मया व आलफ

बार बार

पौ छ १७ रजब सन तिसा मया आलफ

[शाब्दिक फेरफार असलेली याच कागदाची एक नकल हातीं आली होती, ती रद्द केली.]

ले. ३७ देवळें-चित्रे | श्री | श. १६३० फाल्गुन वा। १४ इ. २७ फेब्रु. १७०९

नकल

स्वस्ति श्री राज्याभिषेक शेके ३५ सर्वधारी सवत्छरे फालगुण बहुल चतुर्दसी रविवासरे क्षत्रिये कुलावंतस श्री राजा **शाहू छत्रपति** स्वामी याणी समस्तराजकार्य-धुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री **नारो पंडित** सचिव यासी आज्ञा केली ऐसीजे **बापुजी सोनाजी** देशकुलकर्णी व **जनाजी राम** ता। **मुठेखोरे** याचे गावकुलकर्णाचे देहे सात बी।।

मौजे उरवडे	मौजे कोंढूर	मौजे जातेगाव	मौजे भोवली
१	१	१	१
मौजे अंबवली	मौजे माळेगाव	मौजे आंबेगाव	(मवली)
१	१	१	

येकूण देहे सात पेशजी राजश्री **शामराज नीलकंठ** याणी गावकुलकर्णाचे वतन सताबले मारनिल्हेचे वडिलापांसून घेतले होते ऐसियास सन सबामध्ये किले **सिहगडचे** मुकामी **शामराज नीलकंठ** याचे नातू **सामराज माहादेव याणी** गोतमुखे निर्वाहा करून आत्मसंतोषे देशकुलकर्णियाचे वडिलास द्रव्य दिल्हे होते ते घेऊन पूर्वील राजपत्रे व याचे वडिलापासून कयेपत्र घेतली होती ती याची यास देऊन सदरहु

गावकुलकर्णाची वृत्ति याचे स्वाधीन केली पुढे आपणासी व आपले वौषपरंपरेसी या वृतीसी संमध नाही म्हणून आपले पत्र लेहून दिल्हे यैसीयासी **बापुजी सोनाजी** देशकुलकर्णि ता। मजकूर याणी किले **पनालियाचे** मुकामी स्वामीसंनिध विनंती केली की सदरहु वृती आपली पूर्वापार आहे त्यास सामराज नीलकंठ याणी सन आर्बा खमसैनात आपल्या वडिलापासून सताबले देहाये मजकूरच्या गाव कुलकर्णाची वृती करून घेतली होती त्यास **सामराज महादेव** याणी गोतमुखे निर्वाह करून आपला टका जो वृतीसमंधे दिल्हा होता तो घेऊन पूर्वील राजपत्रे व आपले वडिलाची पत्रे आपणास देऊन वृती आपले दुमाले केली व आपले पत्र लेहून दिल्हे की अपणासी वृत्तीसी अर्थाअर्थी समंध नाही अैसा निर्वाहा जाला आहे तरी स्वामींनी कृपालु होऊन आपली वृत्ती आपले दुमाले करून नूतन पत्रें करून देविली पाहिजेत म्हणून विनंती केली त्याजवरून...... मनास आणून मारनिल्हे पासून सेरणीचा निर्वाहा करून घेऊन नूतनपत्रें करून दिल्हीं त्यास राजश्री पंताजी सिबदेव याणी विदित केले की जिल्हे अपणाकडे अहे सेरणीचा निर्वाहा अपले जिल्हेकडे करून घ्यावा लागतो त्यासी देशकुलकर्णि याजपासून सेरणीचा निर्वाहा करून घेतला——— बि॥

हुजूर ——— रु. राजश्री पंताजी सिवदेव याजकडे जिल्हे मुले २००-रु.
३००

येकूण रुपये पाचसे हुजूर निर्वाहा करून घेऊन वतन याचे दुमाला करून पत्रें करून दिल्ही व तुम्हांसही आज्ञापत्रे सादर केली अैसे असता तुम्हीं याचे भाऊबंद याजपासी मागती सेरणी मागता तोष्ट लाविले अहे म्हणून मारनिल्हेनी हुजूर विदित केले तरी पूर्वी सेरणीचा निर्वाहा हुजूर जाला असता फिरोन सेरणीविसी तगादा करावा हे गोष्ट उचित नव्हे याउपरि याजला व याचे भावबंदाला सेरणीचा तगादा येकदर न लावणे याची वृती सुरळीत चालवणे बहुत लिहिणे तरी तुंम्ही सुज्ञ असा मोर्तब असे

रा। छ २ मोहोरम
बार

ले. ३८ } श्री { श.
देवळें-चित्रे } { इ.

[**घाट आणि खिंडी** यांचा हा एकच कागद उपलब्ध झाला]

१ सापलखिंड मौजे कर्जे पो मजकूर या गावातू......स्त मार्ग असे पुढे **ढवले घाटास** मार्ग मिळाला असे

१ घाट ढवला मौजे ढवले पो मजकूर घेराचंद्रगड या गावात दरोबस्त असे माथ्यास गाव मौजे जोर प्रांत वाई इलाखा सातारा पाइज्यापासून माथा पर्यंत कोष २॥ अडीच

१ कोंडेनलीचा मार्ग होता तो चंद्रराव मोरे याचे कारकीर्दीत चालत होता पुढे सिवाजी माहाराज याचे कारकीर्दीत मोडला

१ कालेधोंडीचा मार्ग मौजे क्षेत्रपाल पा। मजकूर या गावातून दरोबस्त आहे माथ्यास गाव मौजे कुमठे तर्फ अटेगाव इलाखा सातारा पाइज्यापासून माथ्यापर्यंत कोष येक

१ ······चोरे खिंड मौजे केवनाले व मौजे किनेसर या दोन गावचे········· हून पारघाटास गाइमुखाचे वर मिलाली·········

··············पांडुरंग देशपांडे कुलकर्णी पो। कोंढवी व तर्फ विन्हेरे रामचंद्र रघुनाथ देशपांडे कुलकर्णी पो। कोंढवी व तर्फ विन्हेरे

[४ व ५ नंबरचे दोनच कागद उपलब्ध झाले.]

किले व कोट माहल मजकुरी आहेत

१ किले रायगड हा किला पेशजी डोंगर होता त्याचे नाव तणस कोणी म्हणत व कोण्ही रासीवटा म्हणत नंतर माहराजा याणी पाहून डोगर माटाजवु दीप ! दिसतो म्हणोन न कोणी नंदादीप असे म्हणतात घलकीचा पाहरा व मदार व आधेरी निजामशाही ठाणे काही येक दिवस होते नंतर कोळी घडसी याची वस्ती होती उपरात सिवाजी माहराज याही किला बांधिला किल्याचे नाव रायगड ठेविले तीनसेसाठ किले माहराजानी बाधिले परंतु सिव्हासनी बसले ते समई कासीचे वगैरे सिष्ट ब्राम्हण आणऊन राज्याभिशक शके १५९६ आनंद नाम सवत्सर जाहाला पुढे मोगलां[नी कि]ला घेऊन हबसियाचे स्वाधीन केला ते समई हबसी याणी किल्याचे नाव इस्मालगड म्हणोन ठेविले कोट पाचाड सिवाजी माहराज याणी बांधिला आणि त्यात वाडा आपल्यास बांधिला होता त्यात जिजाऊ साहेब राहत होती तो कोट पोतनिसाचे आखरीस श्रीमंत माधवराव पेशवे ह्याजकडून किला घ्यावयास आपाजी हरि फौज घेऊन आले ते समई किलेकरी लोंकानी मोडिला त्यास वर्षे अजमासे ——४८ कोट कसबे वाडी येथे किल्याचे नवे दरवाजा खाली खेरतखान हबसी याणी दगडकोट बाधिला होता त्यात दाहापाच वर्षे वस्ती केली पुढे कोट मोडून जंजिरास गेले

—

१

सदरहु किल्याची व कोटाची बंदिस्ती करून जमीदार याचे विद्येमाने रयतेस कौल देऊन मुलकाची वसाहत करून माहमुरी होई ते समई

१ जमाबंदीचा सिरीस्ता

१ मलिका आंबर निजामशाई वजीर

याचे कार[की]र्दीत तो मारची वसाहत नव्होती ते समई सेताचे थल पाहून सेतावर टकबंदी ठराऊन साडेतीन टक्यास येक रुपया प्रो आकार होईल त्यात जमीन नाकारी नदीगर्क वजा करून लागवड जमिनीस घेत टक बंदी थलाची चाल पिकाचा आजमास पाहोन साहाव्या हीश्शास टके दर खडीस कुडव गाव पाहून ठराऊन घेत

१ चंद्रराव मोरे याचे कारकीर्दीत सदरहु प्रमाणे वहिवाट चालली

१ शिवाजी माहाराज याचे कारकीर्दीत टकबंदी मोडून हरजिनसी आरधेल घेत त्यास बटाई म्हणतात

१ सभाजी माहाराज याचे कारकीर्दीत आनाजी दतो

[पुढील सर्व मजकूर नष्ट.]

[पुढील मजकुराचा अर्धाच कागद उपलब्ध झाला.]

१ किले चंद्रगड मौजे ढवले प्रगणे मजकूर येथील कुमेत पाहाडी डोंगरावर आहे आगोधर चंद्रराव मोरे याचे ठाणे होते चंद्रराई मोडल्यानंतर सिवाजी माहाराज याही किल्याची बंदिस्त जागजागा करोन किलाचे सरंजामास प्रगणे मजकूर पैकी गाव च्यार व तर्फ बिरवाडी पैकी देहे ३ येकूण सात गाव सरजामास नेमणुक किल्याची वहिवाट होऊ लागली हलीं कंपिणी आमलात किल्याची वसाहात नाही किल्याचे सात गावची वहिवाट तर्फ बिरवाडीकडे होते

१ कसबा कोढवी या गावांत कोट निजाम[शाहीं]त होत तो चंद्रराव मोरे याही पाडला.........

१ किले प्रतापगड हा किला प्रो कोढवी व त[र्फ]......हे गाव हरदु माहालचे हादीवर मोठा पाहाड डोंगर आहे त्या डोंगरावर सिवाजी माहाराज यांही बंदिस्ती केली ते शके १५७९ पंधरासे......

[पुढील मजकूर नष्ट.]

ले. ३९ चौल–अधिकारी श्री श. इ.

राजश्री रगाजी सबनीस व बाबाजी कुलकरणी व रामाजी भानापे ?
गोसावी यासी

सेवक चिमणाजी आउजी विनती उपरि तुम्ही लिहिले कलो आले साडेसातसे रुपये लिहिले तरी येवज माहाराज सर्व तुम्हास तो कलतो व गण सेणवी यासही ठाउके असे यास येत्न करिता राजश्री गण सेणवई या कडून जे होईल ते करवणे

त्यापासून होये सारिखे आहे म्हणून लिहितो व आजीवर यास तो येसे कार्य सागितले नव्हते बरे जे करीतील ते करून आम्ही ग्रहस्तपणे लिहिले होते बेरजेपैकी होतील ते आवघे तुम्ही व **नारायेण सेणवी** मान्य करणे इतका इतबार तुमचा नाही की काये गण सेणवीयास म्हणावे की तुम्ही मान्य करणे आम्ही..........दो दिवसी देतो तुम्ही हाती घेणे दो दिवसी पैके घेणे जा। हाती देगे तोवरी तुम्हापासी असो येसे नेमस्ते करून घेणे जे कपितान व **गण सेणवी** द्रव्य म्हणतील ते मान्य करणे आणि कार्य करणे येव्हाच द्रव्य पाठवावे तरी आमचे द्रव्य × × × ळीस आहे आणाया माणूस टाकोटाक गेले असे उदिया सायेकाली येईल परवा देऊ यास खता नाहीं वेरीज दुणी होये ते करणे व कार्य करून घेणे नव्हे न करीत तेव्हा मग जगदीश समर्थ असे काही चिता नाही ईश्वर फुरसत उदड देईल जाणिजे हे विनंति.

[× × × — फाटलें. ......नीट उलगडत नाही.] [पत्र एकाच अक्षरांत.]

ले. ४०
चौल—अधिकारी

श्री

श. इ.

श्री सकल गुणालंकर्ण अखंडित लक्ष्मी आळाकृत
राजमान्ये राजश्री **बावाजी बावा** व राजश्री
भावजी बावा प्रभु मो **ठाणे** स्वामीचे सेवेसी

सेवक **कृस्णाजी माणकाजी** अदिकारी मामले चेऊल राम राम विनंती उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करीत असिलें पाहिजे विशेष त्याहावचा कारण जे तुमचे आमचे वडील व तुम्ही आम्ही येक ठिकाणीं नांदत आलों हे सविस्तर आपणास विदित आहे पूर्वी चेऊल आबाद असता सवत्सर प्रतीपदेस पंचांग आधीं जमीदारांकडे वाचावें त्याजवर सुभे मामले दांजकडे वाचावें अैसी परंपरागत होती सांप्रत आम्हा जाणतां जमीदारांपैकी खारबंदीमधे आमचे घर होतें ते समई बाबू जोसी प्रातकालीं आमचे घरीं येत त्यास आम्ही तात्यांकडे पाचारणे करू तें समई अंताजी अथवा चिमणाजी यांस पंचाग श्रवण करावयास पाठवावें तेथून तात्या यांकडे वाचावे तेथून राजकोटीं वाचावें तेथून राजपूरचे अमलदार यांकडे वाचावें हे आपणास दखल असे चेऊलप्रांती दत व प्रायेस्चित व डांकीस्थल व नुरीस्थल हीं कलमें अदिकारी यांची श्वचत्र त्यामधे अकरा खुंमे सेटी कासार यांची व सात खुमे चोधरी यांची श्वचत्र आहेत हालीं तुम्हा आम्हा जाणतां **अनाजी नाईक** सदीवाल व **मल्हार सेट** वाणी योन्हे दत घेतले ते समई सरनोबत सदीवाल व शामलाकडील अमलदार व ब्राह्मण प्रभू भले लोक आणून समारंभ केला होता त्याजकडील दताचा सेला अदिकारी येहीं घेतला

त्याजवर नार माहात्रा पीट माहात्रा आरेकसी पाखाडी बेल्हावी येण्हे दत घेतला व **गोवर माली** येण्हे **रामा गुरव** मौजे **वरडे** याचा लेक वाडी **सर्फादिनखान** वाकेनवीस दत घेतला व हबनाक बागमला येण्हे दत घेतला हे तुम्हास विदित आहे ब्राम्हणाकडील दत प्रायेस्चीत देशाई व तो **अस्टागर** व तो **झिराड** येथील दत प्रायेस्चीत देशपाडिये यांचे चालत आहे सदरहु दोन्ही कलमाची परांपरागत आपणास दखल असेल तें येथार्थ लेहून पाठवावें बहुत काय लिहिणे रुपा लोभ असों देणे श्री— चरणांरविंदी चित स्थिर असों यावें हे विनंती

(कागदावर अन्य अक्षरांत 'सलास आर्बा')

ले. ४१ } श्री { श. इ.

शिवकालीन टिपणें.

[सदर यादी आम्हांस पोलादपूर येथील चित्रे घराण्यांत रा. रावजी गोविंद चित्रे यांचे दप्तरांत मिळाली. हें घराणें खंडो बल्लाळच्या वंशजांचीच एक शाखा असल्यामुळें कागद महत्त्वाचा वाटतो. या टिपणांतील कालोल्लेख अनेक ठिकाणीं सर्वस्वी चुकीचा आहे; पण त्यांतील व्यक्ती ऐतिहासिक आहेत, प्रसंगांबाबतहि लेखक ऐतिहासिक सत्यच सांगतो असें आमचें स्पष्ट मत झालें; म्हणून हीं टिपणें येथें देत आहोंत. जीं टिपणें अन्यत्र अनेकदां प्रसिद्ध झाल्याचें आम्हांस आढळून आलें, तीं रद्द करून बाकीचीं येथें उधृत केलीं आहेत.]

(१) [इ. स. १६१२ मे ६] शालिवाहन शेके १५३४ परिधारी [वि]नाम संवत्सरे, सन इसने आशेर आलफ छ १५ रावल-कारकीर्द खान आलीखान (नफी आलम दरवल कमाल) खान हैबतखान यानी तर्फ आटेगाव सुभा जावली यास रकमाला दिल्हा सन इसने आखेर.

[गोल कंसांत दिलें, ती लेखकाची नकलनांना झालेली चूक. 'रफीअल कदूर वल मकरन' असें पाहिजे.]

(२) [इ. स. १६३३-३४] शेके १५५५ श्रीमुख नाम संवत्सरे आर्बा सलासीन व आलफ-मुरार जगदेवराव विज्यापूरचे पातशाहाचे वजीर याची नागरगाव येथे तुला केली सुा तुला

[पत्र सा. सं. ले. ३६३ प्रमाणें वर्ष बरोबर.]

(३) [इ. स. १६३९-४०] शके १५६१ प्रमाथी नाम संवत्सरे सन आर्बैन आलफ-बालाजी चंद्रराव मोरे जावलीस सिवाजी राजे याणी निराजीपंतास वगैरे जमावास आपणाजवल ठेविले, सन १०४९

(४) [इ. स. १६४२-४३] शके १५६४ चित्रभानु नाम संवत्सरे, सन सलास आर्बैन आलफ, सन १०५२ – मावळचे सरदंत शाहामृग पर्वत होता तेथे सिवाजी माहाराजे याणी ठाणे घालून इमारत केली आणि **राजगड** नाव ठेविले.

[रा. खं. १५ पत्र नं. २६७ प्रमाणें वर्ष चूक. राजगड बांधल्याचें वर्ष १६४५. शहामृग पर्वत' चे ऐवजीं 'मुरुमदेव डोंगर' असा उल्लेख. शिवाय सभासद पृ. ९ मध्यें पहा.]

(५) [इ. स. १६४४-४५] शके १५६६ तारण नाम संवत्सरे सन खमस आर्बैन आलफ, सन १०५४ - हणमंतराव मोरे जांभळीस गोविंदराव मोरे जोरास बालाजीराव जावलीस येशवंतराव सिवतरास भिकाजीराव देवलीस

सिवाजी राजे राजगडी लोकांची संचणी केली.

(६) [इ. स. १६४७-४८] शके १५६९ सर्वजित नाम संवत्सरे, सन समान आर्बैन आलफ – कारकीर्द मोगल चंद्रारावपंत हवालदार गंगाजी आकोपंत मजमदार कजवे दाई चंद्रराव राजे मोरे जावली.

(७) [इ. स. १६४८-४९] शके १५७० सर्वधारी नाम संवत्सरे सन तिसा आर्बैन आलफ, सन १०५८ – शिवाजी राजे राजगडी सामराज नीलकंठ रांझेकर कारभारी प्रधान.

[सभासद पृष्ठ ७ पहा. शहाजीस पकडल्याच्या या वर्षी शिवाजीनें हालचाली केल्या नाहींत. अपवाद फक्त फत्तेखानावरील पुरंदरच्या स्वारीचा. तेव्हां शिवाजी राजगडावर-राजधानीच्या जागीं राहिला.]

(८) [इ. स. १६५६ मार्च ३०] शके १५७७ मन्मथ नाम संवत्सरे, सन सीत खमसैन आलफ, सन १०६५ – सिवाजी राजे यास जावली सुभाचे कोण्ही भेटले धाकनोजी गेले [गोळे] याणी कौल छ १३ जाखरचा आणिला रायेरीवरील गोळे वेगले करून कौल दिल्हा.

राजे माहाबळेश्वरी येऊन जावली सुभा हस्तगत केला आणि रायेरीस आले.

[जे. श. त शके १५७८ चैत्र शु. १५ (ता. ३० मार्च १६५६) या दिवशीं शिवाजीचें जावलीहून प्रयाण व चैत्र वाा ७ (६ एप्रिल १६५६) रायगड काबीज करण्यास आले. शिव च. प्र. पृ ५०]

(९) [इ. स. १६५६–५७] शके १५७८ दुर्मुखी नाम सवत्सरे, सबा खमसैन आलफ, सन १०६६-सिवाजी राजे यानी भोरपा डोंगर यास इमारतकाम येडका बुरुजाजवळ लाविले आर्जोजी यादव हवालदार इमारत उर्फ प्रतापगड.

[सभासद पृ. १०.]

(१०) [इ. स. १६५७-५८] शके १५७९ हेमलंबी नाम संवत्सरे, समान खमसैन आलफ, सन १०६७-आबाजीपंत व रामराव प्रभु रायेगडचे इमारतीवर ठेविले लिंगाणा उर्फ दरे (?) गड याजवर चंदरराव आटकत ठेविले.

(११) [इ. स. १६६०-६१] शके १५८२ शार्वरी नाम संवत्सरे, सन इहिदे सितैन आलफ, १०७०-किले कांगोरीस इमारत चालती जाहाली.

(१२) [इ. स. १६६२-६३] शके १५८४ शुभकृत नाम संवत्सरे, सलास सितैन आलफ, सन १०७२-सिवाजी राजे याची पत्रे सरज्याराव देशमुख ताा रोहिड-खोरे-सन १६६२ जून २७ व जुलै २६ या दिवशीं शिवाजीनें जेध्यांस पत्रें पाठविलीं. पहा. -सा. ले. २१९ व राखं १५।२७५ राखं १५।३३९, २७६ पहा.]

(१३) [१६६५-६६] शके १५८७ इस्वावसु नाम संवत्सरे, सीत सितैन आलफ, सन १०७५--रावो बलाल सुभेदार नामजाद माहालानिहाये प्रांत तळकोंकण यानी तर्फ चिरवाडी व प्रो कोंढवी यास कौल दिल्हा टकबंदी जमाबंदीचा ठराव करून दिल्हा.

(१४) [इ. स. १६६६-६७] शके १५८८ पराभव नाम संवत्सरे, सबा सितैन आलफ, सन १०७६ - कादवा डोंगर होता. इमारत बांधून महिपतगड नाव ठेविले डोबर हवालदार ठेविला.

(१५) [इ. स. १६६७-६८] शके १५८९ प्लवंग नाम संवत्सरे, समान, सितैन आलफ, सन १०७७ - नीलकंठ मोरेश्वर व रघुनाथ पंडितराय यानी विठल दतो सुभेदार जावली व निलोपंत यास पत्र लेहून दिल्हे श्रीवरदायनी कापडे बुा या देवीचा गाव होता तो दूर करून मोईन करून दिल्ही पत्र बजिनस असे [नि. अक्षरांत] या साली आनाजी दतो याणी ऐनजिनसी जमाबंदी केली.

[जेधे शकावलींत याच वर्षी मुलखाची बटाई केल्याचा उल्लेख.]

(१६) [इ. स. १६६८-६९] शके १५९० कीलक नाम संवत्सरे, तिसा सितैन आलफ, १०७८ - कृष्णाजी भास्कर सुभेदार प्रांत मावळ.

[नि. अक्षरांत] श्री भवानीची स्थापना किले प्रतापगड येथे केली. [सुमारें दहा वर्षांची चूक झाली आहे.]

शके १५९५ प्रमाथी नाम संवत्सरे, आबा

(१७) [इ. स. १६७३-७४] रत्नसाला होती सिव्हासन तयार करविले. सबैन, १०८३ रामाजी दतो याजकडे

शके १५९६ आनंद नाम संवत्सरे, सन

(१८) [इ. स. १६७४ मे ३०] राज्याभिषेक ज्येष्ठ शुाा ५ खमस सबैन आलफ, सन १०८४- सिवाजी राजे यास संभाजी राजेयाचा वृतबंध जाहला वृतबंध सिवाजी राजे यास वर्षे पंचेचालीस होती प्रधान रामचंद्र नीलकंठ मजुमदार तेच वेळेस जाहला मोरो त्रिमल पिंगले पेशवे

रुजु[1] निळो सोनदेव यास मजमु सांगितली. शामजीपंतास डबिरी सांगितली राघो बलाल आत्रे यास कोकणचा सुभा सांगितला आनाजीपंतास सुरनिसी सांगितली.

[१ राज्याभिषेकाचे वेळीं निळो सोनदेव हयात नाहीं; तेव्हां तो मजमुदार हें चूक.]

(१९) [इ. स. १६८१] शके १६०३ दुर्मति नाम संवत्सरे, इसने समानीन– संभाजी राजे राज्याभिषेक शके ८ नीलकंठ मोरेश्वर प्रधान.

या सालात न्यून्य मास.

कासी रंगनाथ प्रा मावल सुभेदार

विठल शंकर देशाधिकारी प्रा जावली.

[यावर्षी पौष ' हा क्षयमास आहे. कासी रंगनाथ जावळीचा देशाधिकारी १६०२ शकामध्यें आहे. श्री सां. ले. ४०; इ. वृ. १८३४ पृ. ३२८; विठ्ठल शंकर शके १६०५ मध्यें आहे स. प. १६१]

(२०) [इ. स. १६८२] शके १६०४ दुंदुभिनाम संवत्सरे, सलास समानीन आलफ, राज्याभिषेक शके ९–मोरेश्वर पंडितराव विठल शंकर देशाधिकारी नेतोजी पालकर सरणोबत

[नोंद बरोबर संदर्भादाखल ऊग्र प्र. संभाजी पृष्ठ ३३ पहा.]

(२१) [इ. स. १६८३] शके १६०५ रुधिरोद्गारी नाम संवत्सरे, आर्बा सलासीन आलफ, राज्याभिषेक शके १० – संभाजी राजे राजापूर प्रांती ब्राह्मणास गाव मकरसंक्रांतीस दिल्हा.

(२२) [इ. स. १६८९] शके १६११ शुक्ल नाम संवत्सरे, सन तिसैन आलफ राज्याभिषेक १६ – राजाराम प्रतापगडाहून चंदीप्रांती मार्गस्त जाहाले

[नोंद बरोबर – पहा स्थिरबुद्धि राजाराम पृष्ठ ७]

(२३) [इ. स. १६९०] शके १६१२ प्रमोद नाम संवत्सरे, इहिदे तिसैन, राज्याभिषेक शके १७– राजाराम चंदीस [नि. अक्षरांत] हिरोजीराव दरेकर याणी प्रतापगड घेतला कामरखान मोगलाकडील होता.

[प्रस्तुत पुस्तकांतील ले. १६ पहाः– नोंद बरोबर.]

(२४) [इ. स. १६९२] शके १६१४ आंगिरा नाम संवत्सरे, सलास तिसैन आलफ, राज्याभिषेक शके १९— येसाजी हरि व कृष्णाजी हरि व अंताजी हरि व शंकराजी प्रानजी प्रभु दिनकरराव व दुर्गवाडीकर देशपांडे व पिलाजी बिन भोनजी गोले व यरुणकर वगैर वतनदार व नूतन वतनदार यास राजपत्रे दिल्ही [राजाराम

छत्रपति] नीलकंठ मोरेश्वर प्रधान [प्रल्हाद निराजी प्रतिनिधि] व निलो बलाल चिटनिविस रामाजी दतो व गोविंद आत्माजी व समस्त सरदार बरोबर होते रामचंद्र नीलकंठ [आमात्य] व परशराम त्रिंबक देशी होते

[चौकटी कंसांतील मजकूर नंतरचा, निराळ्या अक्षरांतील.]

(२५) [इ. स. १६९५] शके १६१७ युवा नाम संवत्सरे, सीत तिसैन आलफ, राज्याभिषेक शके २२– नीलकंठ मोरेश्वर प्रधान प्रल्हाद निराजी प्रतिनिधि रामाजी दतो व शंकराजी दतो यानी चंदीचे मुकामी विनंति केली आपले बंधु सरकार कामावर खर्च जाले——राजाराम छेत्रपति रामचंद्र पंडित आमात्ये

(२६) [इ. स. १६९९] शके १६२१ प्रमाथी नाम संवत्सरे, सन मिया आलफ, राज्याभिषेक शके २६, आश्विन शुा १४ — राजाराम छत्रपति रामचंद्र नीलकंठ आमात्य शंकराजी नारायण सुरनीस

फाल्गुन शुा ८ राजे सिंव्हगडी वारले

विठल गोपाल सुभेदार जावली

कार्तिक बहुल द्वितिया— राजा शिव छत्रपति नीलकंठ मोरेश्वर प्रधान विठल नरसिंव्ह घोलकर कुलकर्णि कोंढवी माहालचे चालवीत होते ते मृत्य पावले.

(२७) [इ. स. १७००-०१] शके १६२२ विक्रमनाम संवत्सरे, इहिदे मया आलफ, राज्याभिषेक शके २७ – राजा शिव छत्रपति नीलकंठ मोरेश्वर प्रधान परशराम त्र्यबक प्रतिनिधि राणोजी भोसले हवालदार किले प्रतापगड विठल गोपाल सुभेदार प्रांत जावली.

रामचंद्रपंत आमात्य यानी तानाजी केशव व रायाजी विठल यास तुडिलचे वतन चवथाई देशकुलकर्ण याची पत्रे करून दिल्ही.

(२८) [इ. स. १७०२ डिसें १७] शके १६२४ चित्रभानु नाम संवत्सरे, सलास मिया, राज्याभिषेक शक २९, पौष बहुल ११ भृगुवासरे राजा शिव छत्रपति नीलकंठ मोरेश्वर प्रधान परशराम त्र्यंबक प्रतिनिधि विठल गोपाल सुभा जावली गोविंद आत्माजी संभाजी राजे याजकडून जंजिऱ्यास गेले.

(२९) [इ. स. १७०७ एप्रिल ३०] शके १६२९ सर्वजित संवत्सरे, समान मिया राज्याभिषेक शक ३४, वैशाख बहुल १०— शाहू राजे याचे निशाण प्रतापगडावर गिरमाजी पिसाल घेऊन आले.

[शक, मिति इत्यादींचा मेळ नाहीं. राज्याभि. शकाप्रमाणें सन १७०८ आहे; पण तेव्हां संवत्सर सर्वधारी व शक १६३० येतो.]

(३०) [इ. स. १७०९] शके १६३१ विरोधी नाम संवत्सरे, सन आशर मया आलफ, राज्याभिषेक शक ३६– शाहु राजे याचा कौल देशपांडे कोंढवी व विन्हेर यास आला गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि नारो शंकर सचिव

व्यक्ति-स्थल-सूचि

[पुढें दिलेले आकडे पृष्ठांचे आहेत.]

समाप्त

भारत–इतिहास–संशोधक–मंडळ, पुणें

वर्ष ३४ अंक ३, ४

[शिवचरित्र साहित्य–खंड १०]

मंडळ–वृत्त

पाक्षिक सभा शक १८७५ च्या

पा. स.	निबंधलेखक	निबंध
१	चिं. ग. कर्वे	(१) गांडापूर महाल रसदेसाठीं गहाण सु. ११९७
	”	(२) शाहूच्या कारखान्यावरील अंमलदार
	”	(३) तांबवेकर सावकाराची कर्जफेड सु. ११६४
	”	(४) आनंदवल्लीची पाटीलकी सु. ११९९
	ग. ह. खरे	(५) मितिशुद्धि
	दि. का. कामत	(६) संगमेश्वर–कर्णदेव चालुक्य
२	ह. बा. भिडे.	(७) नैषधीय चरितांतील एक श्लोक
	ग. ह. खरे	(८) सोलापूर देशमुखांकडील फर्मानें
	वि. रु. पाटणकर	(९) महाराष्ट्रांतील एक उपेक्षित कवी, हैबतीबुवा घाटगे.
३	का. गो. पिंगळे	(१०) देवासकर पवाराविषयीं थोडे.
	”	(११) तोतया यशोदाबाई पेशवे.
	शं. ना. जोशी	(१२) उमले येथील वर्तकपणा इ. १८०७
४	र. रु. पाटणकर	(१३) श्रीधरभट्ट जोशीकृत कुंडार्णव
	”	(१४) ऐ. भाऊबीज
	भी. ल. परतुडकर	(१५) हरिदास कान्हाकृत भीष्मपर्वाचा रचनाकाळ
	शं. ना. जोशी	(१६) कुवारी गडासंबंधीं पत्रें इ. १८०२–१८०३
	”	(१७) तिकोना किल्यासंबंधीं पत्रें
	ग. ह. खरे	(१८) अमीर खुस्रव नव्हे फर्रुखफाल–चित्रचर्चा
५	शं. ना. जोशी	(१९) मालाड–देसाई
	वा. अ. शेटखलप	(२०) गोव्यांतील नाणीं
	ग. ह. खरे	(२१) मितिशुद्धि

नगरसंशोधन वृत्त–शक १८७५ पाक्षिक सभा

पा. स.	निबंध लेखक	निबंध
१	शं. ना. जोशी	(१) पेशव्यांचा सिकारखाना इ. १७९९
	,,	(२) नवलाख उंबऱ्याच्या सेठ्यामहाजनांचें पत्र
	,,	(३) नारो आप्पाजी व बावधन गांव श. १६९६
	चिं. ग. बर्वे	(४) पुणे अखबारांतील पुण्याबद्दलचे उल्लेख
२	,,	(५) मानभावाविरुद्ध मोहीम. श. १७०५
		(६) घराचे साक्षीपत्र. श. १७३६
		(७) घोटवड्याचें शेटेपण श. १६६७
	शं. ना. जोशी	(८) दुसऱ्या बाजीरावाचे सोंडूर कार्तिकी यात्रा मुक्काम
३	,,	(९) खडकीचें जोसकुलकर्ण श. १६६१
	,,	(१०) आळंदीच्या वाटेवरील झाडें श. १७५२

नवीन सभासद यादी

शक १८७५ आषाढ शु १ ते आश्विन शु. १५ अखेर

स.क्रमांक	सभासद नांव	गांव	वर्ग	
२६१४	श्री. गोविंद श्रीधर गोरे	पुणें २	वार्षिक	४
२६१५	,, सदाशिव गोविंद सोनपठेकर	मोमिनाबा.	,,	४
२६१६	प्रो. गिरी श्रीधर दीक्षित	पुणें ४	,,	४
२६१७	श्री. वामन आनंतशेट खलप (खालप)	पुणें ४	,,	४
२६१८	श्री. विद्याधर रामकृष्ण सबनीस	पुणें २	,,	४
२६१९	श्री. सेक्रेटरी, पंढरपूर एज्युकेशन सोसायटी	पंढरपूर	,,	२
२६२०	श्री. हेडमास्तर, गव्हर्मेंट हायस्कूल जालना	जालना	आजीव	४
२६२१	श्री. भगवान् त्रिंबक सिधये	कल्याण	,,	४
२६२२	डॉ. श्री. रामजी उपाध्याय	सागर	वार्षिक	३
२६२३	श्री. रघुवीरप्रसाद बिंद्राप्रसाद आवस्थी	आकोट	,,	४
२६२४	Shri Buba Ram Varma	Dehra-dun	,,	३
२६२५	श्री. मनोहर विश्वनाथ देवचके	पुणें २	,,	४
२६२६	श्री. शिवराम पांडुरंग जोशी	पुणें २	,,	४
२६२७	श्री. नारायण विनायक जोशी	पुणें २	,,	४

संतोषोद्गार

(1) It is a great experience to have a look round the "Mandala" especially in the company of Mahamahopadhyaya D. V. Potdar.

Date 10-7-1953. B. S. MURTI, New Delhi

---

(२) आज मी भारत इतिहास संशोधक मंडळाची व्यवस्था कशी असते व तेथें काय आहे हें पाहणेचे उद्देशानें आलों. मंडळाची कामगिरी पाहतां हें अनेक प्रकारानें हल्लींचे पिढीस तसेंच पुढील पिढीकरतां माहितीचे दृष्टीनें अतिशय महत्त्वाचें आहे. हें सर्व पाहून मला अतिशय आनंद झालेला आहे. संशोधनाचे दृष्टीनें आजपर्यंत मी अनेक गोष्टी ऐकिलेल्या आहेत. त्या दृष्टीनें संशोधनाचे कार्यांत मंडळानें इतकी आघाडी मारलेली आहे हें पाहून अतिशय आनंद झाला. हें काम सार्वजनिक दृष्टीनेंच पाहिलें पाहिजे व प्रत्येकानें आपले सवडीनुरूप मंडळास मदत करावी अशी सर्वांस मी विनंती करीत आहे. मंडळापैकीं रा. खरे यांनीं मोठ्या आस्थेनें जी मला माहिती दिली व सर्व वस्तु दाखविल्या त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेंच मंडळानें हें जें काम हातीं घेतलें आहे त्यांत परमेश्वरानें त्यास पूर्ण यश द्यावें असें मी इच्छितों.

ता. १६–८–१९५३

परशरामपंत गणपुले
मोरवी

---

(३) इस महान् संस्थाकी कठीन तप और त्यागयुक्त सेवाका परिणाम है। मराठा इतिहासके साधनोंका यह अपूर्व संग्रह राष्ट्रीय महत्वका है। अवश्यही संस्थाकी ओरसे उस साहित्यके समुचित प्रकाशन और संरक्षण के लिये सार्वजनिक और सरकारी सहायताकी अधिकाधिक अवश्यकता है।

ता. १४–९–१९५३

वासुदेव शरण अग्रवाल
काशी विश्वविद्यालय.

---

(४) भारत इतिहास संशोधक मंडळास आज भेट देण्याचा योग लाभला. संस्थेच्या कामाची माहिती नाहीं असा महाराष्ट्रांत तरी निदान कोणी नसेल. भेटींत पुष्कळच प्राचीन इतिहासाचें ज्ञान झालें. ऐतिहासिक वस्तुसंग्रह व जुने ऐतिहासिक ग्रंथ आणि इतिहास प्रसिद्ध स्त्रीपुरुषांचीं चित्रें पण पाहायला मिळालीं.

संस्थेच्या संशोधन कार्याची पण माहिती घेतली. कांहीं सेवाप्रवृत्त कार्यकर्ते अगदीं अल्प वेतनांत आपल्या स्फूर्ती देणाऱ्या इतिहासाचें संशोधन करीत आहेत; त्यांच्या कार्याचें महत्त्व अमोल आहे.

संस्थेनें चालविलेलें संशोधन अधिक मोठ्या प्रमाणांत व्हायला हवें. संस्थेजवळ जुनें लिखाण पुष्कळच आहे. तें जगापुढें येणें जरूर आहे. संस्थेला त्या बाबतींत आर्थिक अडचण आहे. सरकारनें व जनतेनें ती दूर केली पाहिजे.

पुणें, ता. ४-१०-१९५३.

भाऊसाहेब हिरे
महसूल मंत्री, मुंबई राज्य

9602

साह्य मिळत असे. मंडळामार्फत गेल्या नऊ वर्षांत असे चार ग्रंथ प्रसिद्ध झाले. मध्यंतरीं एक दोन वर्षें हें काम झालें नाहीं. यंदा विश्वस्तांनीं उचल केली, तेव्हां श्री. शंकरराव जोशी यांनीं 'मराठी राजवटींतील कांहीं घाटमार्ग व चौक्या' हा साधनग्रंथ विवेचक प्रस्तावनेसह संपादून तो श्रीमंत बाबासाहेब इचलकरंजीकर स्मारक ग्रंथ–मालेंतील क्र. ५ वा म्हणून प्रसिद्ध केला. नुकतेंच कांहीं दिवसांपूर्वी म. म पोतदार यांच्या संशोधित कागदपत्रांचा प्रसिद्ध झालेला खंड सभासदांचे हातीं आतां पडला आहे. प्रस्तुतचा श्री. आवळसकर संपादित खंड श. १८७५ च्या त्रैमासिकाचे अं. ३-४ म्हणून सभासदांस मिळतील. व श्री. शंकरराव जोशी संपादित 'मराठी राजवटींतील कांहीं घाटमार्ग व चौक्या' हा ग्रंथ मंडळ त्रैमासिकाचे शक १८७६ चे अं. १–२ म्हणून सभासदांस यथाकाल मिळतील. कृपा करून सभासदांनीं दम धरावा. कारण या ग्रंथांत घाटांचे नकाशे देण्याचें काम अजून पूर्ण व्हावयाचें आहे. असो. मंडळावर कृपालोभ असावा.

× × ×

यंदा मंडळाच्या त्रैवार्षिक निवडणुकी झाल्या. कारभारी मंडळांस श्री. विठ्ठलराव घाटे, प्रा. सोवनी, श्री. पां. रं. गोखले अशा कांहीं नव्या सदस्यांचा लाभ झाला. श्री. घाटे हे यंदाच्या मराठी साहित्य सम्मेलनाचे अध्यक्ष झाले. कारभारी मंडळानें त्यांचें मनःपूर्वक अभिनन्दन केलें.

नव्या कारभारी सदस्यांचीं नांवें अन्यत्र दिलीं आहेत.

श्री. ग. ह. खरे हे अहमदाबाद येथील प्राच्य विद्या परिषदेस मंडळाचे प्रतिनिधि म्हणून उपस्थित होते.

× × ×

प्रस्तुत अंकाला व्यवहार व अर्थ ह्यांच्या सोयीकडे लक्ष्य देऊन पौष व चैत्र असेंहि म्हणावें लागलें आहे व अंकाची पाठवणीहि त्या धोरणानें करावी लागेल.

वि. सूचना— सभासदांनीं आपापले पत्ते कळवावे; व वर्गणी पाठवावी.

चिटणीस

भा. इ. सं. मंडळ धनत्रयोदशी }
श १८७५ ता. ४।११।५३

५६२

अखिल भारतीय इतिहास-परिषद्

१६ वें अधिवेशन-वाल्टेर

या परिषदेचें १६ वें अधिवेशन यंदा नवीन निर्माण झालेल्या आंध्रराज्यांत वाल्टेर येथें भरेल. परिषदेच्या तारखा २९-३०-३१ डिसेंबर या आहेत. **महामहोपाध्याय** डॉ. **पां. वा. काणे** हे अधिवेशनाचे अध्यक्ष आहेत. याखेरीज विभाग-अध्यक्षांचीं नांवें पुढीलप्रमाणें : विभाग १ ला (प्राचीन इ. स. ७११ पर्यंत) श्री. अमलानंद घोष, डायरेक्टर जनरल ऑफ अर्केऑलजी, नवी दिल्ली; विभाग २ रा (इ. स. ७१२-१२०६) डॉ. एम्. रामाराव निजाम कॉलेज हैद्राबाद; विभाग ३ रा (इ. स. १२०६-१५२६) मे. ख्वाजा महंमद अहमद क्युरेटर, हैद्राबाद म्युझियम; विभाग ४ था (इ. स.१५२६-१७६४) डॉ. रघुवीरसिंह सितमौ; विभाग ५ वा (१७६५-) डॉ. ए. सी. बानर्जी कलकत्ता विद्यापीठाचे इतिहासाचे प्राध्यापक. यांखेरीज कटकचे प्रा. सुब्बाराव हे स्थानिक विभाग परिषदेचे अध्यक्ष नियोजित आहेत.

या परिषदेचे चिटणीस डॉ. पी. सी. गुप्ता-१२५, राशबिहारी ॲव्हेन्यु, कलकत्ता २९;- आणि खजिनदार डॉ. ए. सी. बानर्जी-२ कॉलेज स्क्वेअर कलकत्ता-१२ हे आहेत. यंदाच्या अधिवेशनाचे स्थानिक चिटणीस प्रा. गुर्ती वेंकटराव, आंध्र विद्यापीठ वॉल्टेर हे आहेत.

वॉल्टेरला मुंबई-पुण्याहून जाणारांनीं हैद्राबाद-बेझवाडा मार्गे जावें. प्रतिनिधि फी दहा रुपये. प्रतिनिधि निश्चित झाल्यास रेल्वेचा सवलतीचा दर (एकवेळच्या भाड्यांत परतीचा प्रवास) मिळतो. शक्य असेल त्या महाराष्ट्रीयांनीं या संधीचा लाभ घेऊन आंध्रास भेट द्यावी.
